
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पंधरावे / अंक २ / फेब्रुवारी २०१४

## संपादकीय

### कला क्षेत्र- काही विचार

'कला म्हणजे, सत्य शिव आणि सौंदर्य मिलाप.' याप्रमाणे 'कला' या शब्दाच्या अनेक व्याख्या मानवी इतिहासात केल्या गेल्या व रूढ झाल्या. प्राचीन भारत, इटली यांसारख्या देशांतील शिल्पकला, नृत्यकला, संगीत साहित्य, अभिनय अशा कलांचा अविष्कार सहज नजरेआड करण्यासारखा नाही; किंबहुना या कलांचा इतिहास त्यांनी समाजाची केलेली जडणघडण यातूनच मानवी संस्कृतीचा विकास झाला. 'जे चांगले असते त्याचे अनुकरण करावे' ही प्रेरणा प्रबळ होती.

परंतु काळाच्या ओघात शिक्षण, राजकारण, कलाविष्कार यासर्व क्षेत्रांमध्ये कमालीचा बाजारूपण फैलावला आहे. एकूणच जीवनाचे होत गेलेले व चालू असणारे अवमूल्यन प्रत्येक पिढीला प्रकर्षाने जाणवत चालले आहे. 'आमच्या वेळेला कलेचा असा बाजार नव्हता. कलेला वाहून घेतलेले असामान्य प्रतिभेचे कलाकार होते. आज कशालाच काही अर्थ उरलेला नाही' अशी खंत जुनी पिढी नेहमीच व्यक्त करताना दिसते. या पिढीतील कलेच्या अभिरुचीला 'कालबाह्य' असे म्हणत, नाके मुरडणारी नवीन पिढी दिवसागणिक वाढत चाललेली आढळते. यामागील कारणे खूप आहेत. कलेचा आविष्कार कलेच्या संकल्पना कलेच्या व्याख्या हे सर्व बदलत आहे आणि प्रदूषित होत आहे.

मुद्रित माध्यमांपासून ते सर्व प्रसारमाध्यमांनी खरे तर कलेच्या विकासाला हातभार लावायला हवा. या माध्यमांनी कलेचा विकास सर्व सामान्य माणसाला जाणवेल याचा काटेकोर प्रयत्न करायला हवा. पण दुर्दैवाने सर्वच क्षेत्रांमध्ये पोटाची खळगी भरण्याची धडपड चालते. सिनेमा नट नट्या यांचे अर्थशून्य भपकेबाज आकर्षण, टाकाऊ जीवनशैलीचे अंधानुकरण, तरुण पिढीच्या आजच्या काळामध्ये होत आहे.

याचा अर्थ कलाकारांनी विना मोबदला कलाविष्कार करावा असे होत नाही. राजकारण, शिक्षण, कला, या सर्वच क्षेत्रांमधील माणसे चैनीच्या ज्या व्याख्या असतील, त्या व्याख्यांमधील चैन करण्याची धडपड करतात. चित्रपट प्रदर्शित झाला की दहापैकी नऊ चित्रपटांच्या बाबतीत 'बॉक्स ऑफिसचे सर्व रेकॉर्डस मोडले' अशा प्रकारच्या बातम्या, जाहिराती आपल्याला वाचाव्या लागतात. कलाकारांची, राजकीय मंडळींची कमाई कोटी कोटी रुपयांच्या घरात जाते. भपकेबाजपणाचा करिष्मा असा आहे की समाज विनाशाच्या कडेवर घेऊन उभा राहिला आहे.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

आज इतिहासजमा झालेल्या चित्रपटांच्या सर्वच अंगांनी सृद्‌ध असलेल्या कितीतरी कलाकृतींनी समाजाचे देणे दिलेले आहे. त्यांना आपण विसरत चाललो आहोत. त्यांच्या तसबिरी घरात लावून भजन करावे असे म्हणावयाचे नाही; पण त्यांच्या योगदानाचे महत्त्व आपल्याला कळले पाहिजे. चांगली कलाकृती निर्माण करता आली नाही, तरी अशा कलाकृतीचे मूल्यमापन करण्याइतकी रसिकता आपल्याकडे पाहिजे रसिकतेच्या फूटपट्ट्या पार बदलत चालल्या आहेत. कला आणि चारित्र्य यांचे संबंध संपत चालले आहेत. अजिंठ्यासारख्या लेण्या काय किंवा प्रभातच्या चित्रपटांसारखे उत्तमोत्तम चित्रपट काय, या कलाकृतींनी व कलावंतांनी अनेक पिढ्यांना पुरेल असा वारसा समाजाला दिला आहे. साठोत्तरी काळात 'जुने जाऊ द्या मरणालागुनि' अशी वृत्ती मूळ धरू लागली. त्यामुळे सर्व प्रकारच्या कलांचे आयाम बदलत चालले. त्या कलावंतांनी जे निर्माण केले आहे त्यामागील त्यांची धडपड, त्यांनी काढलेले खडतर दिवस यांचा विसर पडेल इतके आपण कृतघ्न असता कामा नये.

'पैशासाठी सर्व काही' ही हाव घेऊन जे कलावंत कलाक्षेत्रात येऊ पाहतात, त्यांनी कंबरेचे डोक्याला गुंडाळून वाटले तसे वागणे म्हणजे कला होत नाही. सर्वच क्षेत्रांमध्ये, माध्यमांमध्ये गर्दी वाढत चालली आहे. त्यामुळे दर्जाचा विसर पडत चालला आहे. विशुद्ध कलेचे विद्यार्थी आणि काही जातिवंत कलाकार यांचा अपवाद नोंदावाच लागेल पण तो नियम सिद्ध करण्यापुरते दुर्दैव आहे! या विषयाचा आवाका मोठा आहे. परंतु लेखन मर्यादेचे भान ठेवून विषयास केवळ स्पर्श केला आहे.

**– मोहन पाठक**

●●●

## विद्या प्रसारक मंडळाचे स्वप्न

*वेळणेश्वर पाहिलं,*
*ऐकली गाज समुद्राची.*
*परशुरामाने कोकण निर्माण केलं ...*
*त्याचाच आवाज तो*
*या सर्वांशी नातं जोडलं*
*आमच्या विद्या प्रसारक मंडळाने*
*टाकत दोन पावले पुढे*
*ओळखून गरज काळाची*
*परशुरामाच्या हातातील परशु घेत*
*घातला घाव कोकणच्या कातळावर*
*आणि सुरू झाली कहाणी*
*विराट स्वप्न प्रत्यक्षात येण्याची ...*
*अभियांत्रिकी गुरुकुलाची ओळखत गरज*
*वर्तमानाचे आरोग्य जपणाऱ्या*
*आमच्या डॉक्टरांनी*
*स्टेथस्कोप लावला कोकणच्या मातीला*
*तिची नाडी ओळखत*
*केली धडपड सुरू*
*डॉक्टरांची विजय मिळवणारी स्पंदने ऐकत*
*समुद्रही घाबरला.*
*आता आपला प्रतिस्पर्धी समोर आहे*
*असा विचार करत, क्षणभर थरारला ...*

**– मोहन पाठक**

●●●

वर्ष पंधरावे/अंक २/फेब्रुवारी २०१४

वर्ष पंधरावे/अंक २/फेब्रुवारी २०१४


**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक ८ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | प्रा. मोहन पाठक | |
| २) | 'दिशा' सूची २०१३ | श्री. सचिन गराटे | ३ |
| ३) | सर्वोच्च न्यायालयासमोर जेलमधून केलेल्या याचिकेतील कसाबसाठीचा युक्तीवाद | प्रा. सौ. श्रीविद्या जयकुमार | ९ |
| ४) | नर्मदा परिक्रमा भाग : २ | श्री. अरविंद ओक | ११ |
| ५) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय तेरावा विषय : क्षेत्र क्षेत्रज्ञ योग | कै. शं. बा. मठ | १६ |
| ६) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २१ |
| ७) | अनाम प्रेम | श्रीमती आशा भिडे | २७ |
| ८) | साहित्य-जगत | श्री. शरद जोशी | २९ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३१ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगी मूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

– संपादक

# 'दिशा' सूची २०१३



| क्र. | लेखक | लेखाचे शीर्षक | वर्ष:अंक | महिना | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १. | असीम | मला उमगलेले गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोर (दोन कवितांचे भाषांतर) | १३:४ | जाने. | ३० – ३१ |
| | | –"– | १४:२ | फेब्रु. | २४–२५ |
| २. | आगरकर, सुधाकर | १. केंब्रिजच्या प्राणिशास्त्र संग्रहालयाला भेट | १४:८ | ऑग. | ३–५ |
| | | २. क्युफू येथील धार्मिक स्थळाला भेट | १४:७ | जुलै. | ३–६ |
| | | ३. जपानी विद्यार्थ्यांबरोबर दोन आठवडे | १४:१० | ऑक्टो. | ३–४ |
| | | ४. जीनान : एक औद्योगिक शहर | १४:४ | एप्रि. | ११–१३ |
| | | ५. जीनान शहरातील बाडुटू झरा | १४:९ | सप्टे. | १०–१२ |
| | | ६. फेरफटका ऑक्सफर्ड विद्यापीठ परिसरातून | १४:११ | नोव्हें. | ३–७ |
| | | ७. भेट केंब्रिजच्या व्हिपल संग्रहालयाला | १४:१ | जाने. | ८–१० |
| | | ८. भेट गाँग्च्यू मधील नांगसियांग सुओला | १४:६ | जून | १२–१४ |
| | | ९. शॉनडाँग संग्रहालय | १४:३ | मार्च | ३–५ |
| | | १०. सन यात सेनच्या जन्मगावाला भेट | १४:२ | फेब्रु. | ५–७ |
| | | ११. सायनोट्रक कारखान्याला भेट | १४:५ | मे | ३–४ |
| | | १२. हर्टफर्ड कॉलेज | १४:१२ | डिसें. | ५–६ |
| ३. | आठल्ये, श्रीनिवास | १.'ऑन्टॉलॉजी' | १४:१० | ऑक्टो. | २७–३० |
| | | २. ग्रंथालय संगणकीकरण आणि ग्रंथपालांची मानसिकता | १४:१२ | डिसें. | २५–२७ |
| ४. | करंदीकर, श्री. वि. | १. श्री. माधव नामदेव पाटील : अविस्मरणीय आठवणी | १४:६ | जून | २० – २१ |
| ५. | कुलकर्णी, प्रिती | १. पूर्व प्राथमिक – ए. के. जोशीचे वार्षिक स्नेहसंमेलन | १४:२ | फेब्रु. | ३१–३२ |
| ६. | गराटे, सचिन | १. दिशा सूची –२०१२ | १४:२ | फेब्रु. | २६–३० |



खरी मुक्ती ही बंधनांच्या क्षेत्राच्या बाहेरच असते.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | जोशी, शरद | १. साहित्य-जगत | १४:२ | फेब्रु. | २०-२३ |
| | | २. -"- | १४:३ | मार्च | २१-२५ |
| | | ३. -"- | १४:५ | मे | २१-२७ |
| | | ४. -"- | १४:६ | जून | २८-३३ |
| | | ५. -"- | १४:७ | जुलै | १६-१८ |
| | | ६. -"- | १४:८ | ऑग. | १०-१४ |
| | | ७. -"- | १४:९ | सप्टें. | २४-२५ |
| | | ८. -"- | १४:१० | ऑक्टो. | २०-२४ |
| | | ९. -"- | १४:१२ | डिसें. | ३४-३६ |
| ८. | जोशी, सुभाष | १. एक कमालीचा छंदिष्ट माणूस- श्रीकृष्ण गोविंद उर्फ नाना पारनाईक | १४:३ | मार्च | १८-२० |
| ९. | ठाकूर, सुधाकर | १. सोनोपंत दांडेकर-आधुनिक महाराष्ट्राचे संत | १४:१० | ऑक्टो. | १८-१९ |
| १०. | तांबे, स्वाती बाळ, जयकुमार, श्रीविद्या बनसोडे, मिथून(भाषां.) | १. अश्लील चित्रपटाची पोस्टर्स सार्वजनिक वहानांवरती आणि रस्त्यावरती लावण्याबद्दल निषेध | १४:१ | जाने. | २७-२९ |
| ११. | देवधर, अबोली | १. धर्म स्वातंत्र्य आणि अंधश्रद्धेविरुद्ध कायदा | १४:१२ | डिसें. | १७-१८ |
| १२. | नाडकर्णी, नरेंद्र | १. आर्य धर्माचा प्रसार - काल आणि आज | १४:८ | ऑग. | १७-२२ |
| | | २. प्रार्थना | १४:७ | जुलै | १९-२२ |
| | | ३. प्रेममूर्ती एस्.व्ही. आणि ५५ ची बॅच | १४:५ | मे | ५-७ |
| | | ४. महायोगी श्री अरविंदांच्या समाज-शास्त्रीय विचारधारेवर आधारित लेखांक-५ | १४:१ | जाने. | ११-१५ |
| १३. | नायक, दि. कृ. | १. श्री. माधव नामदेव पाटील-अविस्मरणीय आठवणी | १४:६ | जून | २१-२२ |
| १४. | परांजपे, सुनिल | १. सिद्धहस्त चतुरस्त्र जोडरागांचा बादशहा संगीत भूषण पंडीत राम मराठे | १४:९ | सप्टें. | १८-२१ |
| १५. | परांजपे, ह. श्री. | १. कै. राजाभाऊ भावे - ठाण्याचे ''सत्वस्थ'' ज्ञानप्रेमी व्यक्तिमत्त्व | १४:१२ | डिसें. | २८-३१ |
| | | २. गुरुवर्य स. वि. कुळकर्णी यांस आदरांजली | १४:१ | सप्टें. | २९-३१ |

माणसाची निवड ही त्याच्या संस्कार बद्धतेवर आधारित असते.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६. | पाटील,अंकिता रविंद्र | १. जलसाक्षरता काळाची गरज | १४:७ | जुलै | २७– |
| १७. | पाटील, महेश | १. आता तरी जाग येईल का? | १४:४ | एप्रि. | २६–२७ |
| १८. | पाटील, मा. ना. | १. ग्रामीण भागात पूर्वी घडलेली एक चढाओढ कथा | १४:४ | एप्रि. | ९–१० |
| | | २. स्वातंत्र्यवीर श्री. विनायक दामोदर तथा तात्याराव सावरकर यांची नाशिकला भव्य मिरवणूक..एक आठवण | १४:२ | फेब्रु. | १४–१५ |
| १९. | पाटील, संजय | १. अधिक मास. | १४:१ | जाने. | ५–७ |
| २०. | पाठक, मोहन | १. उंच माझा झोका | १४:११ | नोव्हें. | १६–१७ |
| | | २. देव्यापराधक्षमापन स्तोत्र–मराठी पद्यानुवाद | १४:१० | ऑक्टो. | ९ |
| | | ३. मी का नाही | १४:१ | जाने. | ३२–३४ |
| २१. | पावडे, धीरज | १. क्रांती हवी | १४:७ | जुलै | ३१–३२ |
| २२. | बनसोडे, एम.डी. | १. सहकार क्षेत्राचं चांगभल | १४:१२ | डिसें. | ३२–३३ |
| २३. | बेडेकर, विजय | १. अधर्म जेव्हा धर्म होतो | १४:१२ | डिसें. | ३–४ |
| | | २. एका चित्राची कूळकथा | १४:९ | सप्टें. | ३–७ |
| | | ३. डॉ. मो. दि. पराडकर – आदरांजली | १४:२ | फेब्रु. | ३–४ |
| | | ४. धर्मशास्त्र का घटना? | १४:६ | जून | ३–४ |
| | | ५. मी कोण? | १४:१ | जाने. | ३–४ |
| | | ६. हतबल केदारनाथ | १४:९ | सप्टें. | ८–९ |
| २४. | बोर्डे, दिनकर | १. 'फ्युटेक–१३' एका नव्या पर्वाची सुरुवात | १४:३ | मार्च | २७२८ |
| २५. | भालेराव, स्वाती | १. जागतिक महिला दिनानिमित्त | १४:४ | एप्रि. | १८–२१ |
| २६. | भिडे, आशा | १. थंडीच्या लाटा हलव्याला काटा | १४:७ | जुलै | ७–९ |
| | | २. प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं | १४:५ | मे | १८–२० |
| | | ३. श्री. विवेक कुलकर्णी यांना अनावृत्त पत्र | १४:८ | ऑग. | १५–१६ |
| २७. | मठ, शं.बा. | १. श्रीमत् भगवद्गीता– विषय प्रवेश | १४:१ | जाने. | १६–२२ |
| | | २. श्रीमत् भगवद्गीता– अध्याय पहिला अर्जुन विषाद योग | १४:२ | फेब्रु. | ८–१३ |
| | | ३. श्रीमत् भगवद्गीता– अध्याय दुसरा विषय :सांख्ययोग | १४:३ | मार्च | ६–१४ |

संस्कारबद्धतेचा विळखा इतक्या बेमालूमपणे पडतो, की आपण बद्ध आहोत याची जाणीव माणसाला नसते.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ४. श्रीमत् भगवद्‌गीता– अध्याय तिसरा<br>विषय : कर्मयोग विचार | १४:४ | एप्रि. | ३–७ |
| | | ५. श्रीमत् भगवद्‌गीता– अध्याय चौथा<br>विषय : ज्ञानकर्म संयास योग | १४:५ | मे | १२–१७ |
| | | ६. श्रीमत् भगवद्‌गीता– अध्याय पाचवा<br>विषय :कर्म संन्यास योग | १४:६ | जून | ९–११ |
| | | ७. श्रीमत् भगवद्‌गीता– अध्याय साहवा<br>विषय : आत्म संयमन योग | १४:७ | जुलै | १०–१५ |
| | | ८. श्रीमत् भगवद्‌गीता– अध्याय सातवा<br>विषय : ज्ञान विज्ञान योग | १४:८ | ऑग. | ६–९ |
| | | ९. श्रीमत् भगवद्‌गीता– अध्याय आठवा<br>विषय : अक्षर ब्रह्म योग | १४:९ | सप्टें. | १३–१७ |
| | | १०. श्रीमत् भगवद्‌गीता– अध्याय नववा<br>विषय : राजविद्या राजगुह्य योग | १४:१० | ऑक्टो. | ५–८ |
| | | ११. श्रीमत् भगवद्‌गीता– अध्याय दहवा<br>विषय : विभूतियोग | १४:११ | नोव्हे. | ११–१५ |
| | | १२. श्रीमत् भगवद्‌गीता– अध्याय अकरावा<br>विषय : विश्वरूप योग | १४:१२ | डिसें. | १९–२४ |
| २८. | मथुरे, हेमचन्द्र स. | १. गुरुवर्य एस्. व्ही. आणि माध्यमिक<br>शिक्षणोत्तर विद्यार्थी | १४:७ | जुलै | २३–२६ |
| २९. | मराठे, मुकुंद | १. 'सुवर्ण मंदार' (संगीत भूषण राम मराठे<br>यांच्यावरील लेख) | १४:१० | ऑक्टो. | १३–२७ |
| ३०. | मुजुमदार, सी. श्री. | १. कै. श्री. मा. ना. पाटीलःएक आदरणीय व्यक्तिमत्त्व | १४:६ | जून | २२–२३ |
| | | २. रामचरित मानस | १४:४ | एप्रि. | २२–२५ |
| | | ३. –"– | १४:५ | मे. | ८–११ |
| | | ४. –"– | १४:६ | जून | १५–१९ |
| ३१. | राऊत, स्वाती अ. | १. आयुर्वेद | १४:९ | सप्टें. | २७–२८ |

संस्कारबद्धतेचा जाच वाटू लागतो तेव्हा माणसाला त्यातून सुटण्याची धडपड करावी वाटते.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३२. | वझे, मंगला अ.<br>वझे, अशोक मा. | १. नर्मदा परिक्रमा भाग – १ | १४:११ | नोव्हे. | १८–२४ |
| | | २. नर्मदा परिक्रमा भाग – २ | १४:१२ | डिसें. | ९–१६ |
| ३३. | वाघ, विनाद एच्. | १. कौटुंबिक कलह टाळता येऊ शकतो | १४:८ | ऑग. | २३–२४ |
| | | २. नरबळी...अध्यादेश, २०१३ | १४:११ | नोव्हे. | ८–१० |
| | | ३. सायबर कायदे : एक ओळख | १४:१० | ऑक्टो. | १०–१२ |
| ३४. | वांदरकर, वैभव | १. भारतीय जनगणना २०११: एक दृष्टिक्षेप | १४:७ | जुलै | २९–३० |
| ३५. | शिंगाडे, चंद्रकांत | १. अष्टविनायक दर्शन | १४:६ | जून | २४–२७ |
| ३६. | साने, यशवंत | १. भारतीय संस्कृती–बीज, मॉडेल व साधना | १४:१ | जाने. | २३–२६ |
| | | २. –"– | १४:३ | मार्च | १५–१७ |
| | | ३. –"– | १४:४ | एप्रि. | १४–१७ |

**तक्ता क्र. १ – संपादकीय**

| महिना | वर्ष/अंक | संपादकीय |
|---|---|---|
| जानेवारी | १४:१ | आपण आत्मपरीक्षण करणार का? |
| फेब्रुवारी | १४:२ | विज्ञान दिन |
| मार्च | १४:३ | जागतिक वन दिन, जल दिन, हवामन दिन |
| एप्रिल | १४:४ | संस्कृती भंजन की वर्धन? |
| मे | १४:५ | जबाबदारी आणि अधिकारांची जाणीव |
| जून | १४:६ | डेकं चालू शकणार नाही असा 'सामान्य'नागरिक |
| जुलै | १४:७ | आपत्ती व्यवस्थापनातील अव्यवस्था |
| ऑगस्ट | १४:८ | व्यसनाधीनतेचे चक्रव्यूह |
| सप्टेंबर | १४:९ | विकृत उत्सवप्रियता आणि हतबल समाज |
| ऑक्टोबर | १४:१० | नकाराधिकाराचा निर्णय |
| नोव्हेंबर | १४:११ | भारतीय नेत्यांचा 'इतिहास' |
| डिसेंबर | १४:१२ | जाहिरात आणि खर्च |

**तक्ता क्र. २ – परिसरवार्ता**

| महिना | वर्ष/अंक | पृष्ठ |
|---|---|---|
| जानेवारी | १४:१ | ३५–३८ |
| फेब्रुवारी | १४:२ | ३३–३८ |
| मार्च | १४:३ | २९–३८ |
| एप्रिल | १४:४ | २८–३८ |
| मे | १४:५ | २८–३८ |
| जून | १४:६ | ३६–३८ |
| जुलै | १४:७ | ३३–३८ |
| ऑगस्ट | १४:८ | २५–३८ |
| सप्टेंबर | १४:९ | ३२–३८ |
| ऑक्टोबर | १४:१० | ३१–३७ |
| नोव्हेंबर | १४:११ | २५–३८ |
| डिसेंबर | १४:१२ | ३७–३८ |

आत्मविष्कार अपरिहार्य होऊन प्रकटते, तेव्हा श्रेष्ठ कलाकृतीचा जन्म होतो.

**तक्ता क्र. – ३ पुस्तक परिचय**

| क्र. | पुस्तक शीर्षक | लेखक | प्रकाशक | परीक्षणाचे शीर्षक | परीक्षणकर्ता | वर्ष/अंक | महिना | पृ. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | आई मी येऊ का? (कथासंग्रह) | दि. र. भालेराव | दिपाली प्रका.,कल्याण | आई मी येऊ का? (कथासंग्रह) | आशा भिडे | १४:२ | फेब्रु. | १६–१७ |
| २ | आठवणी जागतात | राजाभाऊ पेठे | राजाभाऊ पेठे, ठाणे | आठवणी जागतात –आठवणींचा मागोवा | मोहन पाठक | १४:९ | सप्टें. | २६ |
| ३ | कळाव | प्रकाश सोनालकर | शारदा प्रका., ठाणे | कळाव | आशा भिडे | १४:२ | फेब्रु. | १८–१९ |
| ४ | निरसन | प्रल्हाद आवळसकर | मोनिका प्रका.,नाशिक | निरसन | मोहन पाठक | १४:३ | मार्च | २६ |
| ५ | मीच माझा मोर (कथासंग्रह) | प्रशांत अरनोर | पावस प्रका.,कांदिवली | मीच माझा मोर (कथासंग्रह) | आशा भिडे | १४:२ | फेब्रु. | १९ |
| ६ | Mumbai Marathi Granthsangrahalaya The Pride of Mumbai | प्रदीप कर्णिक | डिंपल प्रका., मुंबई | मराठी ग्रंथसंग्रहालयाचा परिपूर्ण अभ्यास | मोहन पाठक | १४:१० | ऑक्टो. | ७–८ |
| ७ | सद्‌गती : दीर्घ कथासंग्रह | प्रल्हाद आवळसकर | मोनिका प्रका., नाशिक | सद्‌गती–एक वाचनीय कथासंग्रह | मोहन पाठक | १४:१० | ऑक्टो. | २५–२६ |
| ८ | सागर (कादंबरी) | प्रतिभा जौहरी | परममित्र पब्लिकेशन, | सागर (कादंबरी) | आशा भिडे | १४:२ | फेब्रु. | १९ |
| ९ | सार्थ ज्ञानेश्वरी (७वी आवृत्ती,१९८०) | सोनोपंत दांडेकर | स्वानंद प्रका. | गीता विश्व | आशा भिडे | १४:६ | जून | ५–८ |

सूची संकलन

**– श्री. सचिन गराटे**

रूपारेल महाविद्यालय, ग्रंथालय विभाग मुंबई

●●●

# सर्वोच्च न्यायालयासमोर जेलमधून केलेल्या याचिकेतील कसाबसाठीचा युक्तिवाद

*कसाब या नावाचाही तिटकारा होता. अशा कसाबसाठी करण्यात आलेल्या युक्तिवादाची ही कायद्याच्या दृष्टीने केलेली चिकित्सा - संपादक*

२००८ सालातील नोव्हेंबर २६-२८ या तारखा कोणताच भारतीय विसरू शकत नाही. या दिवशी १० पाकिस्तानी प्रशिक्षित आतंकवाद्यांनी भारताच्या अखंडतेवर हल्ला करुन १६६ लोकांना मारले आणि २३८ लोकांना जखमी केले. या आतंकवादी हल्ल्यातून झालेल्या संपत्तीचे नुकसान १५० करोडपर्यंत असल्याचे निदर्शनात आले. अजमल कसाबला जिवंत पकडण्यासाठी श्री. ओंबळे आणि इतर पोलिसांनी दाखविलेल्या धैर्य शौर्य आणि बलिदानाबद्दल त्यांचे मानावेत तेवढे आभार कमीच आहेत.

कसाबच्या स्वास्थासाठी मिळणारी मदत, पाकिस्तानी वकिलाची केलेली मागणी, मुख्यन्याय दंडाधिकाऱ्यापुढे त्याने दिलेला जबाब (कलम १६४ फौ.प्र.सं.) न्यायालयाची कसाबसाठी विधी सहाय्यता अधिकर्त्याची नेमणूक, सत्र न्यायालयासमोर कसाबचा जबाब आणि सुनावणी, कसाब आणि त्याच्या सहकाऱ्यांच्या विरोधात असलेले पुरावे यासर्व गोष्टी रोज वर्तमान पत्रातून वाचल्या. सुनावणी दरम्यान अज्ञानी (वयामुळे) असल्याचा त्याने केलेला युक्तिवाद कोणीही मान्य करु शकत नाही त्यामुळे कोर्टाने ती फेटाळून लावला.

तुरुंगातून केलेल्या अपीलामुळे सर्वोच्च न्यायालयासमोर त्याचा खटला चालला. अपिलमध्ये कसाबच्या वतीने कोणताच वकील उभा राहिला नाही. म्हणून सर्वोच्च न्यायालयाने श्री. राजू रामचंद्रन या वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक कसाबसाठी युक्तिवाद करण्यासाठी केली. ( म. अजमल म. आमिर कसाब विरुद्ध महाराष्ट्र सरकार AIR २०१२ sc.३५६५ पृष्ठ कृ.३५६२). श्री. अग्रवाल गौरव यांनी यामध्ये श्री. रामचंद्रन यांना मदत केली. सर्वोच्च न्यायालयाने या दोन्ही अधिवक्त्यांच्या कामाची प्रशंसा केली आणि महाराष्ट्र सरकारला निर्देश दिला की ११ लाख रु. श्री. रामचंद्रन आणि ३.५ लाख रु. श्री. गौरव अग्रवाल यांना मानधन म्हणून द्यावे.

या अनुषंगाने कसाबच्या वतीने केलेले निरनिराळे युक्तिवाद जाणून घेणे महत्त्वाचे ठरले. कारण या खटल्यामध्ये दोन्ही वकील या व्यक्तीचा बचाव पक्ष मांडत होते, जो त्यासाठी पात्र नव्हता. हा खटला कसाबसाठी बचाव मात्र होता. कारण १) निष्पाप लोकांसोबत अमानवी, अक्षम्य पद्धतीचा गुन्हा केला गेला होता. २) कसाबने आपल्या अखंड भारताबरोबरच युद्ध पुकारून त्यास मदतही केली होती. ३) सरकारने यामध्ये कार्यतत्परता दाखवून तपास सरकारी पक्ष आणि कसाब आणि सहकाऱ्यांचे दोषारोप चांगल्याप्रकारे सिद्ध केले होते.

ॲड. राजू रामचंद्रन यांचा कसाबसाठीचा युक्तिवाद

• **नैसर्गिक न्यायतत्त्व नाकारले** - सुनावणी अगोदरच्या टप्प्यामध्ये प्रामुख्याने जबाबच्या अगोदरच्या टप्प्यात वकीलाची सेवा मिळण्याचा अधिकार कसाबला नाकारल्यामुळे त्याची सुनावणी हे तर्कसंगत आणि न्यायसंगत नाही.

• **नैसर्गिक न्याय तत्त्व** - सुनावणी दरम्यान त्याच्या वकीलाला पुरेसा वेळ युक्तिवाद करण्यासाठी देण्यात आला नाही, म्हणून आलेली सुनावणी बेकायदेशीर आहे.

• **कलम १६४ खाली दिलेला जबाब** – कलम १६४ खाली कसाबने दिलेला जबाब हा योग्य आणि खरा दबाव मुक्त वाटत नाही. कारण त्याचे स्वरूप आणि वाक्यांची मांडणी सुयोग्य पद्धतीने करण्यात आली आहे. त्यामुळे असा जबाब असू शकत नाही. त्याचबरोबर अशा संज्ञा कसाबने कधीच वापरल्या नाहीत.

• कसाब त्याच्या सहकाऱ्यांनी नरिमन हाऊस, ताज हॉटेल आणि विओपोल्ड इ. ठिकाणी केलेल्या गुन्ह्यासाठी शिक्षेस पात्र ठरत नाही. कारण सरकारी पक्षाने हा मोठा कट असल्याचे सिद्ध केले नाही.

• कलम १२१ 'भारतीय दंड संहिता' (भारताविरुद्ध युद्ध पुकारणे) हे कसाबला लागू होत नाही. कारण छत्रपती शिवाजी टर्मिनस हे सार्वभौमत्वाचे प्रतीक नाही. त्याचबरोबर भाग–४ यामुळे आतंकवादी कृत्ये ही कलम १२१ या कलमास तार्किक दृष्ट्या नष्ट करतात. भारतीय दंड संहिता हा शिक्षा विषयक कायदा आहे. त्यामुळे 'युद्ध पुकारणे' ही संज्ञ एवढ्या बेछूट अर्थाने वापरून तीस अजून मोठे स्वरूप आणि मोठा अर्थ प्राप्त करून दिला जावू नये.

• शिक्षेसंबंधी प्रश्न – कसाब यास खालील कारणांमुळे फाशीची शिक्षा देवू नये.

• सुनावणीमध्ये तडजोड झाली आणि त्याचा जबाब दबावमुक्त नव्हता. त्याचबरोबर सुनावणी अगोदरच्या प्रक्रियेदरम्यान त्यास वकील मिळाला नाही. न्यायसंगत सुनावणी नसल्याचा थोडाही संशय असताना फाशीची शिक्षा देणे हे अन्यायकारक होईल.

• कसाबचे वय कमी आहे (अंदाजे २१) त्याचे कुटुंब आणि शिक्षण या गोष्टीचा विचार केला पाहिजे. जरी तो भयंकरपणे वागला तरी त्याचा हेतू आणि देशभक्ती या गोष्टी विचारात घ्याव्यात.

• लष्कर–ए–तोयबाच्या हातातील तो एक खेळणं होता. त्याच्या प्रभावाखाली त्याने हे काम केले.

कसाबला फाशीची शिक्षा सुनावताना पाच गोष्टी आणि आजीवन कारावासासाठी सहा गोष्टी त्याच्या गुन्ह्यासंदर्भात विचारात घेतल्या गेल्या. मुंबई उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाने दिलेली फाशीची शिक्षा योग्य ठरली.

लेखिका : **प्रभारी प्रा. सौ. श्रीविद्या जयकुमार**
भाषांतर : **सह प्रा. मिथुन बनसोडे**
वि.प्र.मं. विधी महाविद्यालय, ठाणे

●●●

## पाहणी

'भारतातील इंग्रजी वृत्तपत्रात विज्ञान व तंत्रज्ञान या विषयाला मिळणारे स्थान' या विषयावर भारती दत्त व गर्ग यांनी १.४.२००८ ते ३०.९.२००८ या कालखंडातील ३७ वृत्तपत्रांचा अभ्यास केला. याचा उपयोग भारतीय सर्वसामान्य माणसाची विज्ञान विषयक अभिरुची व तिची जडणघडण यांचा अंदाज येण्यासाठी झाला.

**संदर्भ** : करंट सायन्स,
खंड :१०२, क्र. ९
दि. १० मे, २०१२

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : २**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत. मागील अंकात अनवधानाने ३०० कि.मी.छापले गेले. ते ३००० कि.मी. असे वाचावे- संपादक*

तेळी भरण्यात येथे एक साधु राहतात. दुपारी १०।।- ११ वाजता तेथे पोहोचलो. वृद्ध बाबांनी जेवणाचा आग्रह केला, पण आम्ही थांबलो नाही. तेव्हा त्यांनी आम्हांला डाळ, तांदुळ, तिखट, मीठ, उदबत्तीचा पुडा, काड्यापेटी, तुपाची डबी, बिस्किट पुडा आणि साखरेची पुडी दिली. पूजेचे साहित्य आम्ही आणलेलेच नव्हते. कालच्या तिखट भाजी वरचा साखर व उतारा आणि तुपासह पूजा साहित्य ही मैय्याची इच्छा आम्हांला कळली. (पुढे लेपा मुक्कामी शंकर सीताराम साढ या ९८ वर्षांच्या वृद्ध केवटाने वातीसुद्धा भेट दिल्या.)

गावात मध्यवर्ती प्रशस्त घंटा असलेले एक राम मंदिर आहे. नदीकिनारी एक छोटा आश्रम आहे, तो तयार भोजन देत नाही. शिवाय डास भरपूर असावेत आणि एकांत चमत्कारिक वाटला; म्हणून इच्छा नसतानाही राम मंदिरी मुक्काम ठरविला. गाव छोटे आहे. घरे ५०/६०. तयार भोजन मिळेल का असे विचारूनही कुणी 'या' म्हणाले नाही किंवा उत्साह दाखविला नाही. उलट आश्रमात जा तिथे सोय होईल सांगून अंग झटकून टाकत होते.

मैय्याचे पूजन रोज संध्याकाळीच होत आहे. मिळालेल्या तुपाचा उपयोग करण्यासाठी वाती येथे मिळाल्या आणि आम्ही स्तोत्रे म्हणत असताना सीताराम बाबांनी तुपाच्या वाती करून पूजेत ठेवल्या. अशोकने आणलेला चिनी कंदील छान उजेड देतो. गावात रात्री ८।। वाजता दिवे आले.

या गावात येईपर्यंत पिकांचे पुढील प्रकार पहायला मिळाले. टोकसारच्या पुढे मिरच्यांचे विशषतः लाल मिरच्यांचे पीक तर दुसऱ्या बाजूला कपास, पुढे कुठे उसाची शेते दिसली. शेती विस्तीर्ण, पाणी भरपूर आहे. मंडळी मिरच्या खुडण्यासाठी शेतात; तर कपास खुडणीचे कामही सुरू होते. त्यामुळे गावात जाग कमी दिसते.

### दिवस ४ था : लेपा(वेदांत) माक्डखेडा कठारा बडगाव शालिवाहन व ढालखेडा

सकाळी ७। ला गाव सोडले. रात्री शेंगदाणे, बिस्किटे खाऊन वेळ भागवली. काळ तेली भट्याण सोडल्यावर भारती ठाकूर भेटल्या. गाडी थांबवून त्यांनी चौकशी केली, धीराने जा सांगितले, जपा. कारण परांजपे नावाचे बंधुद्वय काही संकटात आहे, त्यांच्याकडे जात आहोत, असे त्या म्हणाल्या.

भारती ठाकूरना मी ओळखत नव्हतो. परंतु पुण्याचे दुर्घटनाग्रस्त परांजपे आणि आलेली गाडी स्टेशन वॅगनसारखी म्हणजे या गाडीतील व्यक्ती ही गाडी पुण्याहून आलेली नसावी, त्यातून पाहिले तर गाडीवर काही तरी (संस्थेची) अक्षरे दिसली. भारती ठाकूर लेपा येथे काम करत, हे तेली भट्याणला कळले आणि ते स्थान सोडल्यावर ही गाडी आणि आत तीन महिला पाहिल्यावर सहज वाटले, की या भारती ठाकूर असाव्यात आणि ते खरे निघाले. त्या NGO आहेत असे कुणी तरी लेपा गावाजवळ म्हणाले. आणि त्यांचा त्याग कमी लेखला गेला असे वाटले.

### मुक्काम ढालखेडा माध्यमिक विद्यालय

आज नव्या पिकांची भर पडली. ढालखेड्याजवळ एरंडीची लागवड दिसली. माकडखेडा थोडी सडक

(महामार्ग) आहे, तत्पूर्वी लेपा गावाजवळ नदीवर प्रचंड बंधारा दिसला. धरण पाण्यात अनेक गावे बुडणार आहेत. त्या गावातील घरांवर बुडित क्रमांक घातलेले आहेत. या गावांचे पुनर्वसन जवळच होईल, परंतु बुडणाऱ्या शेतीच्या बदल्यात पैसे देण्यात आले, ते अनेकांनी स्वीकारून नवी शेत जमीन खरेदी केली तर काही जणांनी ट्रॅक्टर इत्यादी साधने खरेदी करून धरणाला माती पुरविण्याचे काम मिळविले आहे.

परंपरागत घरे जाणार, याचे वैषम्य गावकऱ्यांच्या बोलण्यात, वागण्यात दिसून येते. अनेक ठिकाणी जमीन मोबदला नाकारून जमिनीला जमीन ही मागणी पुढे येऊन आंदोलन सुरू झाले आहे.

लेपा गावात वाती देणाऱ्या संकर बाबांचा मुलगा किशोर केवट (डॉक्टर) या बडबड्या माणसाने चांगली मदत केली. शंकरबाबा मात्र नवीन पिढी संस्कारहीन, मोठ्यांचा मान न राखणारी आणि कष्ट न करणारी आहे याची खंत व्यक्त करीत होते. (या बाबांनी खूप कष्ट केले आहेत. सूर्योदयापूर्वी शेतीत जाणे व मावळतीला परत येणे असे कामे करण्याची तयारी नव्या पिढीची कुठे आहे??

(आजपर्यंत तिन्ही ठिकाणी मुक्काम श्रीराम मंदिरात हा काही योगायोग नव्हे!)

लेपा सोडले आणि डाव्या बाजूने उंच उंच झाडांच्या छायेतून प्रवास झाला. काल उष्मा खूप, तर आज थंडीमुळे प्रवास सुखद वाटला. माकडखेड्यापासून उसाची दाट शेती सुरु झाली. थोडा वेळ परका रस्ता घेता, नंतर सर्व गाडी रस्ता.

माकडखेडा, कठोरा, बडगाव – प्रवास नदीपासून दूर, नंतर नदीजवळून झाला. नदीच्या तीरावर छान हिरवळ आणि सावली होती. शालिवाहन येण्यापूर्वी मैय्याला मिळणारी एक उपनदी ओलांडावी लागते. जेथे ओलांडायची तेथे प्रवाह चिंचोळा आहे. परंतु दोन्ही तट खूप उंच आणि सरकती वाळू यामुळे फार जपून उतरावे,

**निरीक्षण**

आकाश निळे, अथांग आणि मोकळे. कपास, ऊस, केली, मिर्ची, राई, एरंड टणटणीची भरपूर झाडे, भरपूर फुले, आकाश-गणेश वेलाची लाल चुटुक फुले, बिट्टी पक्षी भरपूर.

**नर्मदे ऽ हर चा अखंड गजर** : भेटणारी प्रत्येक लहान मोठी व्यक्ती नर्मदेऽऽ हर असा पुकारा करते. अगदी दोन तीन वर्षाची मुलेसुद्धा हात जोडून छान नर्मदेऽ हर! चा गजर करतात. वाटेत शेत मजुरांची मुलेसुद्धा मागून पुढून लांबून ओरडून नर्मदेऽऽऽ हर! म्हणतात. त्यांना काहीवेळा बिस्किटांची अपेक्षा असते.

पाऊस भर धुळीच्या रस्त्यावर सकाळी सकाळी पक्ष्याच्या पायांची सुंदर बेलबुट्टी दिसते. हे पक्षी मातीतून चालताना कीटक शोधतात की काय कुणास ठाऊक. पायांचे हे ठसे फार मनोहारी दिसतात.

चढावे लागले. अनेक जण तिथून घसरले हे नंतर कळले. एकाचा तर मोबाईल पाण्यात पडल्याने वाया गेला.

नदीच्या पलिकडील तीरावर 'माहेश्वर' आहे. एक पाणकोंबडी या काठावर, पंख पसरून, ते वाळवीत होती. हे पाहताना खूप छान वाटले.

ढालखेडे येईपर्यंत चार-सवाचार होऊन गेले. पुढील वलगांव ५ किमीवर. त्यामुळे या गावातील एका शाळेत मुक्काम केला. वाटेत एका गावात ताक मागितले आणि ते मिळाले. हे ढालखेडे सुद्धा इतर गावांप्रमाणे खाऊ घालण्याच्या बाबतीत निरुत्साही वाटले.

**ढालखेडा – बलगाव – अकबरपुरा – चितली – कठोरा (मु. भिकारीबाबा आश्रम)**

ढालखेडा येथील आश्रमात आम्ही गेलोच नाही. कारण रात्री आम्हांला जेवायचे नव्हते. मुक्काम गावात करावा तर एक धर्मशाळा बाबांची अस्वच्छ जागा

दाखविली गेली. खोल्या बंद आणि धुळीने भरलेला ओटा, आणि म्हणे येथे मुक्काम करा!

बाजूचे हनुमान मंदिर पाहिले, एक मजली, छान स्वच्छ पण पाणी शाळेमागे हात पंपाचे म्हणून पाहणी करायला गेला. शाळेचे कार्यालय उघडे होते आणि त्यातून मंडळीबाहेर पडून कुलुप लावणार इतक्यात अशोकने



'परिक्रमावासी' अशी ओळख देऊन विनंती केली तर गुरुर्जींनी अगदी सहजपणे बाजूची मोठी खोली म्हणजे हॉलच उघडून दिला. एका मुलाने स्वच्छ झाडू मारून दोन मोठ्या सतरंज्या अंथरल्या व आमची छान सोय झाली.

या गावात येण्यापूर्वी ससावदला ताकाची सोय झाली आणि नंतर आम्ही चहाऐवजी ताकाची चौकशी करू लागलो आणि सहजपणे छान दाट ताक भरपूर प्रमाणात मिळू लागले.

**दिवस ५ वा शुक्रवार : ढालखेडा – कठोरा**

सकाळी ५ वाजता उठलो आणि ६ वाजता आयता चहा मिळाला. तसे रात्री ताकही मिळाले होतेच.

सकाळी ६। वाजता गाव सोडले. रात्री थंडी होती. आकाश निरभ्र आणि निळेशार अथांग दिसते. बलगाम मार्गे उत्साहाने पुढे निघालो. बलगामात शिवा नावाच्या मजुराने स्वागत केले व चहा म्हटल्यावर आम्हांला घेऊन एका घरासमोर आला व चहा सांगितला आणि छान भरपूर चहा मिळाला.

शिवा प्यायलेला होता. चहाचे घर त्याचे नव्हते. नको नको म्हणता तो आम्हांला सोडायला २ किलोमीटर आला. इतकेच नाही तर रस्त्यातील दगड धोंडे बाजूला टाकून देऊन बाभळीचे काटे (फांद्या) काढून फेकत रस्ता आमच्यासाठी साफ करीत पुढे होता. खरे म्हणजे रस्ता अरुंद नव्हता पण त्याची एक श्रद्धा!

मुंबई आग्रा शेडपर्यंत त्याने आम्हांला सोबत केली. अकबरपुरा सोडून पुढे साटकखलच्या टेकडीवर रोपवाटिका होती. तेथील सुरेश शर्मा नावाच्या व्यवस्थापकाने आम्हांला बसवून छान चहा पाजला. खरे म्हणजे ते साइट ऑफिस होते. त्याच्या माणसांपैकी एकाने जाऊन (जवळच्या गावातून) दुधाची पिशवी आणली व चहा केला.

पुढे शकटेश्वर आश्रमात वहीवर शिक्का घेऊन पुढे श्रीराम मंदिराश्रमाकडे गेलो. तेथे भोजनाचा आग्रह झाला. प्रत्येक ठिकाणी थांबल्याने वेळ जातो म्हणून मंगल तयार नव्हती. अक्षरशः लगेच पाने घेतली गेली व दहा मिनिटात आमचे अगदी घरगुती चवीचे भोजन पूर्ण झाले.

जेवण मिळणार नसेल तर बिस्किटे ठीक. परंतु ११/११ ।। वाजता तयार भोजनाचा अपमान करून जाणे बरे नव्हे. नर्मदामैय्या याची फार कठोर शिक्षा नंतर देईलच, याबद्दल माझ्या मनात शंकाच नव्हती. भोजनानंतर लगेच आम्ही मार्गस्थ झालो.

थोडा रस्ता चांगला, डांबरी सडक (मुंबई–आग्रा) ओलांडून नदीच्या पुलाच्या अलिकडून पायवाटेने मार्गक्रमण सुरू झाले. चिचणी येईपर्यंत चांगलीच दमछाक झाली. ऊन कमी असले तरी थकवा येतोच. त्यातून नदीकिनारी झाडी नाही आणि टेकड्या फोडून नदी समांतर मोठ्या रस्त्याचे काम सुरू आहे.

चिचणी ३ वाजता आले. दीड तासात पुढील ५ किमी अंतर कापूर कठोर गाठावे, म्हणून थांबलो नाही. तर गावात पोहोचायला ५ वाजले.

शाळेत मुक्काम म्हणून सर्व वस्तू उतरविल्या. वर्ग छान झाडून मिळाला. समोर पाणी (नळ) होते. दिवे नव्हते. रात्री ८।। वाजता आले असावेत.

स्नानाची तयारी करून मी नळावर मोजे धुतले, नंतर पाणी गेले. लाईट नाही, पाणी नाही राहणार कसे? मुक्काम हलविला व भिकारीबाबाच्या आश्रमात रात्री आसन लावले.

**दिवस ६वा मुक्काम चिचली (मारु) कुमावत**

सकाळी निघताना भिकारीबाबाबरोबर अशोकची वादावादी झाली. कारण अशोक सकाळी डायरी लिहित होता ते पाहून बाबा म्हणाले, ‘ लिहिणे व्यर्थ आहे,’ पुस्तके, ग्रंथ व्यर्थ आहेत म्हणून आम्ही कोणतेही ग्रंथ वाचत नाही.

ब्राह्मण गाव गाठले तेव्हा सकाळचे ११ वाजले होते. घाटावर छोटे मंदिर उघड्या छोट्या पडवीसह आहे. आमच्या आधी पोहोचलेल्या महाराष्ट्रीय गटाने तेथे स्वयंपाक करून भोजन आटोपले होते व त्यांनी आम्हांलाही भोजनाचा आग्रह केला. आम्ही घाटावर स्नान केले व आलो तेव्हा वझेने जेवायचे नाकारले; कारण उरलेले भोजन देऊ केले हे एक,आणि आयुष्यभर स्वयंपाक करणाऱ्या महिलांच्या हातून वाया जाईल इतके अन्न कसे शिजते या रागामुळे! मी मात्र अन्नाचा अवमान न करता प्रसाद घेतला. अशोकचे वागणे मला पसंत पडले नाही. माझ्यासह आणखी आलेले सहा एकजण त्यात जेवले. झाले असे होते की जो शिधा दिला गेला तो सर्व शिजविल्याने इतके अन्न झाले. (नाहीतर उरलेला शिधा बरोबर न्यावा लागला असता) हे उरलेले अन्न नव्हते तर मैय्याने केलेली ही आगाऊ व्यवस्था होती. (हे मला जाणवले.)

‘हे अन्न उरले होते म्हणून जेवलो नाही’ हा अशोकचा समज नर्मदा मैय्याने दूर करण्याचे ठरविले होते हे पुढील गावात लगेच प्रत्ययाला आले.

ब्राह्मण गाव ते जगन्नाथ विश्वनाथ खेडा हे अंतर नदीकिनाऱ्यावरून फक्त एक किलोमीटर, आमचे मात्र दोन अडीच तास मोडले. गावातून बाहेर पडून, पुन्हा दिशा बदलून पायवाटेने बराच वेळ चालत दरीत उतरलो, उपनदी रस्ता काढत, खडक ओलांडत पार करून पठारावर आलो; पठारावर पायवाटा सर्व दिशांना जात असलेल्या आढळल्या. विचारणार कुणाला? कुणीच आसपास नव्हते. एका कुत्रीने या दरीपर्यंत आम्हाला अलिकडील अर्धा एक किलोमीटर सोबत केली होती. अनाहुत पाहुणी आली म्हणून अंगावर येणाऱ्या कुत्र्यांना बगल देऊन ती आमच्यापुढे कुठेतरी पुन्हा प्रकट व्हायची.

**निरीक्षण** : रस्ता दुतर्फा झाडीतून जातो तेव्हा असंख्य केमरे / चिलटे पावलोपावली घोंघावतात. अंधार/ सावली आणि बाहेर उन्ह अशा परिस्थितीत, हे नजरेस येणे अगदी दुपारीसुद्धा हे विचित्र होते.



आम्ही पठारावरून चुकीचा रस्ता धरला होता. परंतु मला दूर समोरच्या टेकड्यांमधून एका पांढऱ्या वास्तूवर भगवे निशाण दिसले म्हणून आम्ही त्या दिशेने गेलो व तेच होते विश्वनाथ खेडा. प्राचीन शिवमंदिर त्याला पांढरा रंग दिला होता व त्यावर ते निशाण लावले.

तेथे फक्त एक घर होते आणि मंदिराच्या ओट्यावर

माणसे ही प्रेम करण्यासाठी असतात आणि वस्तू वापरासाठी, पण आजच्या जगात माणसे वापरली जातात आणि वस्तूंवर प्रेम केले जाते.

अगदी कफनीबाबा हक बाबा. याचना केल्यावर आम्हांला तेथील मुलीने ताक दिले व बाबाने २१२ रुपये दिले. मंदिर छान, प्रसन्न, नेटके आहे.

ब्राह्मण गावापासून उन्हातून इथे येईपर्यंत चांगली दमछाक झाली. झाडी नाही, पठारी विस्तीर्ण भाग, खोल दरी पाठीवर दहा किलो वजन, अगदी कस पाहणारा हा उन्हातला प्रवास.

पठार चढल्यावर गुजराल वारल्याची बातमी ऐकली. कारण एकुलता एक (कामगार) ट्रॅन्झिस्टर घेऊन उभा होता. त्यावर सहज ही बातमी ओझरती कानावर पडली.

विश्वनाथ खेडा ते चिचली (मारु) वाटचाल गाडीरस्त्याने आणि दुतर्फा झाडीमधून अगदी सरळ सरळ अशी आणि म्हणून सौख्यकारक वाटली.

चिचली गावाजवळ केळीच्या बागा दिसल्या. आमचा रस्ता त्यांच्यामधून जात होता. बऱ्याच बागांमध्ये लहान रोपे होती. परंतु दोन तीन ठिकाणी केळीचे तयार घड दिसले. काही केळी तर तयार होऊन साल फाटली होती.

मनात सहज विचार आला, केळी आहेत; पण कुठे विकत मिळताना दिसली नाहीत. पुढे आलो तर एका ठिकाणी ट्रकमध्ये केळी लादण्याचे काम सुरू होते. केळी मिळतील का म्हणून विचारले तर एकाने दहा बारा केळी आणून दिली. मालकांनी (बिहारीलाल) बसायला सांगितले आणि एक मोठा घडच आमच्या समोर आणून दिला.

पैसे देऊ केले तर म्हणाले,'यह घरका केला है।' या प्रसंगापूर्वी गावाजवळ एक तरुण भेटला होता. आम्ही कोण कुठून आलो ही चौकशी त्याने केली. राहण्याची व्यवस्था कुठे कुठे होईल हे विचारताना तयार भोजनप्रसाद कुठे तिघांसाठी मिळेल का? असे म्हटल्यावर 'विशाल कुमावत' नावाचा तो तरुण म्हणाला की गावात गेल्यावर पहिले घर सोडून टेलिफोन आहे त्या घरात सांगा, व्यवस्था होईल.

आम्ही कुठे काही न चौकशी करता सरळ राधाकृष्ण मंदिर गाठले. विशालला आम्ही राम मंदिरात आसन लावू असे सांगून नंतर गप्पा मारायलाही बोलाविले होते.

पेशवाईत शोभावी असे नक्षीची प्रशस्त पडवी ओटी मंदिराला आहे. तेथे विसावलो. तोच मंदिर ज्याचे आहे त्या शर्मा कुटुंबातील मुलीने चहा करून दिला आणि कुणीतरी 'भोजनाला या' म्हणून निमंत्रण देऊन गेले. बिहारी कालसुद्धा गप्पा मारायला हजर होते. भोजनाचे निमंत्रण होते विशाल कुमावतकडून. गावाबाहेर जाताना तो आम्हांला भेटला होता. नंतर कळले की त्याने भावाला फोन करून सांगितले व भाऊ आम्हांला लगेच भोजनाचे बोलवायला आला.

अशोकला हे अन्न तुझ्यासाठी आहे, हेच नर्मदा मैय्याने यातून दाखवून दिले.

पोळी, भाजी, भात, कढी, वरण, आमटी, मुळा, लोणचे, शंकरपाळे, चिवडा असा जेवणाचा थाट होता. आम्ही आधी, नंतर घरचे जेवले म्हणजे 'उरलेले अन्न देऊन अपमानित केलेले नाही आणि सकाळचे भोजनही तुझ्याचसाठी होते. पण तू ते अज्ञानाने / विपरित ज्ञानाने अव्हेरलेस' हेच मैय्याने या प्रसंगातून दाखवून दिले.

रात्री अकरा वाजेपर्यंत गप्पा झाल्या. गावात काही वर्षांपूर्वी गुजराथमधून भक्तिफेरी माध्यमातून काही वर्षे स्वाध्याय चालला आणि आता बंद आहे असे कळले. 'जगदीश' नावाचा तो संचालकही उपस्थित होता म्हणून सारी माहिती मिळाली.

क्रमशः

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

भारतीयांचं आपण खूप देणं लागतो. कारण त्यांनी मोजदाद करायला शिकवलं नसतं तर वैज्ञानिक संशोधन होऊ शकलं नसतं – अल्बर्ट आइनस्टाइन

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय तेरावा
## विषय : क्षेत्र क्षेत्रज्ञ योग

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेखमालेतील हा १३ व्या अध्यायावरील लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो. - संपादक*

### श्लोक १ ते १८ ज्ञान सहित क्षेत्र क्षेत्रज्ञ विचार

श्रीकृष्ण म्हणाला - हे अर्जुना, तत्त्वज्ञानी शरीराला क्षेत्र म्हणतात, जो याला ओळखतो त्याला क्षेत्रज्ञ असे म्हणतात. हे भारता, सर्व क्षेत्रात राहणाऱ्या मला तू क्षेत्रज्ञ समज. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचे जे ज्ञान तेच ज्ञान, असे माझे मत आहे.

हे क्षेत्र म्हणजे काय? ते कशा प्रकारचे आहे? त्याच्या ठिकाणी कोणते विकार होतात? यात कोठून काय होते? तो क्षेत्रज्ञ कोण? आणि सामर्थ्य काय? हे सर्व संक्षिप्तपणे तू मजकडून ऐक. हे ज्ञान ऋर्षीनी अनेक प्रकारे व निरनिराळ्या छंदात पृथक् पृथक् आणि हेतू दाखवून निश्चित अर्थाच्या ब्रह्मसूत्र पदांनीही गायिले गेले आहे.

पंचमहाभुते, अहंकार, बुद्धी (महत्) अव्यक्त (प्रकृती) दहा इंद्रिये एक मन पांच विषय इच्छा, द्वेष, सुख, दुःख संघात, चेतना आणि धारणाशक्ती असे एकतीस प्रकारचे विकार होणारे क्षेत्र संक्षेपतः आहे.

मानी न होणे, दंभ न करणे, अहिंसा, क्षमा, सरळपणा, गुरुसेवा, शुद्धता, स्थिरता, आत्मसंयम, इंद्रिय विषयांचे वैराग्य, अहंकार न करणे, जन्म मृत्यू जराव्याधि दुःख आणि दोष यांचा विचार करणे. अनासक्ती पुत्र-स्त्री-गृह इत्यादिकांत लंपट न होणे, प्रिय आणि अप्रिय यांच्यासंबंधी समभाव धारण करणे, माझ्यावर अनन्यभावाने अढळ भक्ती, एकांत, देशाचे सेवन, जन समूहात येण्याची नावड, अध्यात्म ज्ञानाचा नित्य विचार करणे, तत्त्वज्ञानाचा विचार करणे, याला ज्ञान म्हणतात. याच्याहून जे निराळे ते सर्व अज्ञान होय.

जे जाणल्याने जीव अमृत प्राप्त करतो ते ज्ञेय मी तुला सांगतो. ते अनादी परब्रह्म आहे. त्याला सत् वा असत् म्हणता येत नाही. या लोकी सर्वत्र त्याचे हातपाय, सगळीकडे डोळे, डोके, तोंड आणि सगळीकडे कान आहेत. ते सर्वत्र व्यापून राहिले आहे. त्याच्या ठायी सर्व इंद्रियांच्या गुणांचा आभास झाला आहे. तरी सुद्धा ते इंद्रियरहित आहे. ते सर्वत्र अलिप्त, भरण पोषण करणारे गुणरहित, असूनही गुणांचे भोक्ते आहे. ते सर्व भूतांच्या बाहेरही आहे आणि आतही आहे. ते सूक्ष्म असल्यामुळे जाणावयास कठीण आहे आणि ते दूर असून जवळही आहे. तो ज्ञेय आत्मा अविभक्त असूनही सर्व भूतांच्या ठिकाणी विभक्तासारखा राहतो. तो सर्व भूतांचा पोषण करणारा, नाश करणारा आणि उत्पन्न करणाराही आहे. तो ज्योतींचाही ज्योती आहे व अंधःकाराच्या पलीकडे आहे असे म्हटले जाते. तोच ज्ञान आहे, तोच ज्ञानाने जाणावयास योग्य आहे. तो सर्वांच्या हृदयात राहतो.

याप्रमाणे क्षेत्र, ज्ञान आणि ज्ञेय या विषयी संक्षेपतः सांगितले. हे जणू माझा भाव प्राप्त करावयास समर्थ आहे.

### श्लोक १९ ते ३४ ज्ञान सहित प्रकृति पुरुष विचार

प्रकृती आणि पुरुष या दोहोंनाही तू अनादी समज, त्याचप्रमाणे विकार आणि गुण प्रकृतीपासून उत्पन्न होतात, हेही लक्षात ठेव.प्रकृति हीच कार्यकारणाचे कारण आणि पुरुष हाच सुख दुःख भोगाचा हेतू समजला जातो. पुरुष हा प्रकृतीच्या ठिकाणी राहून प्रकृति जन्म गुणांचा भोग करतो. हाच गुणांचा सहवास उत्तम अथवा अधम योनीत जन्म होण्याचे कारण आहे.

पहाणारा, अनुमोदन देणारा, पोषण करणारा भोक्ता, महेश्वर आणि परमात्मा परमपुरुष याच देहात आहे. जो अशाप्रकारे पुरुषाला आणि गुणासह राहणाऱ्या प्रकृतीला यथार्थपणे जाणतो, तो सर्व प्रकारे वागूनही पुनर्जन्माला प्राप्त होत नाही.

कोणी ध्यान योगाने आपल्या आत्म्याच्याद्वारे आत्म्याच्या ठिकाणी आत्म्याला पाहतात. दुसरे साधक ज्ञान योगाने आत्म्याला पहातात आणि इतर साधक कर्म योगाने आत्म्याला पहातात. दुसरे कित्येक हे मार्ग न जाणता इतर श्रवणाच्याद्वारे उपासना करतात. ते ऐकलेल्या उपदेशात तल्लीन होणारे साधक मृत्यूच्या पलीकडे जातात.

हे भरतश्रेष्ठा, जी काही स्थावर जंगम वस्तू निर्माण होते ती ह्या क्षेत्रक्षेत्रज्ञाच्या संयोगापासूनच निर्माण होते; असे तू समज. जो या नाश होणाऱ्या सर्व भूतात समभावाने असणाऱ्या परमेश्वराला पहातो, तो स्वतः आपल्या आत्म्याच्याद्वारे आत्म्याचा घात करीत नाही. म्हणून तो परमगतीला प्राप्त करतो.

प्रकृतीच्या द्वारेच सर्व कर्मे सर्व प्रकारे केली जातात आणि आत्मा अकर्ता आहे असे जो पहातो, तोच सत्य पहातो.

जेव्हा कोणी साधक प्राण्यांच्या भेदभावाला एकाच आधारात ते स्थिर आहेत असे पहातो आणि त्यापासूनच सर्वांचा विस्तार होत आहे, हेही पहातो तेव्हा तो ब्रह्मच प्राप्त करतो.

हे कुंतीपुत्रा हा परमात्मा अनादी आणि निर्गुण असल्यामुळे अविनाशी आहे, म्हणून तो शरीरात असूनही काही करीत नाही आणि कशाशी लिप्तही होत नाही. ज्याप्रमाणे सर्वव्यापी आकाश सूक्ष्म असूनही कोणत्याही प्रकारे कलंकित होत नाही, त्याप्रमाणे सर्व देहात असणारा आत्मा कलंकित होत नाही. हे भारता, जसा सूर्य या संपूर्ण जगाला प्रकाश देतो तसाच क्षेत्री सर्व क्षेत्राला प्रकाशित करतो.

जे अशाप्रकारे आपल्या ज्ञान चक्षूच्याद्वारे क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचा भेद आणि प्रकृति बंधनातून प्राण्यांची मुक्ती होण्याचा उपाय जाणतात ते परब्रह्माला प्राप्त करतात.

या अध्यायात आरंभापासून अखेरपर्यंत क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचा विचार केला आहे. साधकाला आपल्या उन्नतीच्या दृष्टीने आवश्यक साधन करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. हे शरीर क्षेत्र आहे इदं शरीरं क्षेत्रम् । आणि एतत् यो वेत्ति स क्षेलज्ञः । या क्षेत्राला जो जाणतो त्याला क्षेत्रज्ञ म्हणतात. शेत आणि शेताचा स्वामी यांचा विचार या अध्ययात केला आहे.

प्राकृतिक क्षेत्र - यात प्रकृति भूत, देह, क्षेत्र हे शब्द मुख्यतः आले आहेत. सगुण, तम, जड,क्षर, स्थूल, व्यक्त आदि शब्द गौण आहेत. थोडक्यात सगुण-तीन गुणांनी युक्त, तम-अज्ञान ज्ञान ग्रहणास असमर्थ, जड-चैतन्य रहित, क्षर-नाश पावणारे, स्थूल मोठ्या आकाराचा व्यक्त-प्रकट दिसणारा- प्राकृतिक वस्तूंचे हे गुण आहेत.

**प्रकृती** - पुरुषाची सनातन शक्ती, भूत-प्रकृतिपासून बनलेला पदार्थ, देह-प्राणिमात्रांचे शरीर, क्षेत्र-शेत-इथे वाटेल ते बी पेरता येते. शेताचा मालक वाटेल तो वृक्ष लावू शकतो. आणि त्याचे फल प्राप्त करु शकतो. या दोन शब्दांना या अध्यायात विशेष महत्व देण्यात आले आहे. साधकाने आपल्या देहरूपी शेतात असे बीज पेरावे की त्यामुळे त्याला उत्तम फळ मिळेल. म्हणजे अशी कृती करावी आणि श्रेष्ठ बनावे. कारण जसे बीज तसे फळ. प्राप्त फळामुळे साधकाला दुःख होत असल्यास, त्याने वाईट बीज पेरले होते असे म्हणावे. त्याने प्रयत्न पूर्वक चांगले बीज पेरल्यास चांगले फळ मिळेल व आनंद होईल. सुख दुःखाचे कारण दुसरे कोणतेच नाही.

**क्षेत्र** - हे शेत माझे आहे, इथे मी माझ्या इच्छेप्रमाणे याची

माणसाच्या आयुष्यातले दोन दिवस सर्वात महत्त्वाचे. एक...त्याचा जन्म होतो तो आणि दुसरा...आपला जन्म कशासाठी झाला आहे, हे त्याला कळते तो दिवस.

मशागत करून अधिक सुपीक बनवून चांगले फळ प्राप्त करू शकतो. आपले शेत आहे. हे समजल्यास पुढील गोष्टी आपोआप होतात. आपले कर्तव्य स्पष्टपणे उभे राहते. गुणाप्रमाणे हे शेत राजस, तामस वा सात्विक, असू शकते. निकृष्ट शेतदेखील उत्तम मशागत करून उत्तम बनविता येते. याचप्रमाणे तपस्या, यम नियमांचे पालन, योग, उपासना इत्यादिकांच्याद्वारे तामस प्रकृतीचे सात्विक प्रकृतीत रूपांतर करता येते. उत्तम खत पणी देऊन उत्तम पीक काढता येते. त्याचप्रमाणे या देहक्षेत्रात धर्म कर्मापासून चांगले फळ मिळविता येते. थोडक्यात, आपल्या उन्नतीचे साधन आपल्या हातात आहे ही गोष्ट क्षेत्र या शब्दाने स्पष्ट होते.

**क्षेत्रज्ञ** – हा पुरुष आहे. हा निर्गुण, ज्योति स्वरूप, चैतन्यमय आहे. म्हणजे तो गुणांनी मुक्त आहे. ज्ञाता आहे व प्रेरक आहे. हा अनिर्बंधपणे सर्वत्र संचार करू शकतो. हाच आपल्या देहात वास करतो. हाच आत्मा, हाच क्षेत्री म्हणजे देही आहे. म्हणजेच, देहाचा स्वामी आहे. हा शेताला जाणणारा असल्याने यात कोणते बीज कसे पेरावे, कोणत्यावेळी किती पाणी द्यावे, गवत वगैरे कसे काढून टाकावे, कोणत्यावेळी धान्य व फळ तयार होते, त्या फळाचा कसा उपयोग करावा इत्यादी शेतीविषयक कर्तव्ये याला पूर्ण अवगत आहेत. म्हणून, क्षेत्रज्ञ शब्द अत्यंत सार्थ असा आहे. प्रकृति–पुरुष वाचक शब्द इथे क्षेत्र व क्षेत्रज्ञ या शब्दांनी दर्शविले आहेत.

**क्षेत्र कसे बनले आहे** – एकूण ३१ प्रकारच्या विकारांनी हे क्षेत्र बनले आहे ते येणे प्रमाणे – पांच महाभूते (पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश) एक अहंकार, वैयक्तिक सत्ता, दुसऱ्या वस्तूपासून पृथक् सत्ता, १ बुद्धि–ज्ञान ग्रहण शक्ती, १–अव्यक्त–प्रकृति, अकरा इंद्रिये – पांच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिये (नाक, जीभ, त्वचा आणि कान, हात, पाय, तोंड, जनेनेंद्रिय, मलद्वार) आणि अकरावे मन. १ इच्छा – वासना, आकांक्ष, १ द्वेष–शत्रुत्व करण्याची मनीषा, १ सुख – ज्याच्या योगे इंद्रियाला सुख मिळते, १ दुःख – ज्याच्या योगे इंद्रियाला समाधान मिळत नाही, १ संघात : समूह बनून राहण्याची इच्छा, १ चेतना – चैतन्य, हालचाल, प्रयत्न, १ धृति धारणाशक्ती, पांचविषय – शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध.

पंचमहाभूतात पार्थिव भाग व जलभाग यांच्या संयोगाने, हवा पाण्याच्या संयोगाने सडणे सुरू होते. सूर्यकिरणांनी पृथ्वी शुष्क होते, वायु सर्वांना सुकवितो, यामुळे अनेक विकार होतात. वृक्ष वनस्पती, पशुपक्षी यांची शरीरे तयार होतात, वाढतात आणि नष्ट ही होतात. या विकारांचे शास्त्र हेच रसायन शास्त्र होय. बुद्धीचे विकार, इंद्रियाचे विकार, शब्द स्पर्शादी विकार थोडक्यात सर्व क्षेत्र सविकार आहे. विकृत होणारे, बिघडणारे, बदलणारे असे आहे. हे सारे निर्दोष होण्यासाठी मी असे आचरण करीन. त्यामुळे माझ्यात कोणताही बिघाड उत्पन्न होणार नाही. पुरुषार्थ करावयास साधक स्वतंत्र आहे. त्यामुळे त्याला काय करावे, काय करू नये या संबंधित या विशेष निश्चय करता येईल.

विश्वातील सर्व रूपे ईश्वराची आहेत आणि त्या विश्वरूपात स्वतःचेही रूप समाविष्ट आहे म्हणून मी त्याच्याशी अभिन्न आहे. याचे नाव ज्ञान, या ज्ञानाची मनात स्थिरता झाल्यास मन शुद्ध होते, अभाव स्थिर होतात. ते भाव साधकाला उपयुक्त ठरतात.

**अहिंसा** – सर्व विश्व अखंड एकरस आहे. त्यातून मी वेगळा नाही म्हणून यापैकी कोणाचीही हिंसा केल्यास ती माझीच हिंसा होईल. हिंसाभावाने समाज स्थिर राहू शकत नाही. सर्वांनाच अभय असले पाहिजे. निर्भयता असेल तरच प्रगती शक्य. ज्ञानी पूर्ण अहिंसाशील होतो. अमानित्व – भावी न होणे, मोठेपणा न मिरविणे, आपल्या ठिकाणी चातुर्य इत्यादी श्रेष्ठ गुण असूनही देखावा करत नाही. ज्ञानी असतात तेच अमानी असतात. **अदंभित्व** – दंभ नसणे, दंभ न करणे, हे ज्ञानाचे लक्षण.

आपल्याकडे काही नसताना, आहे असा भास निर्माण करणे याला दंभ म्हणतात. दंभाने हानी होते. ज्ञानी कधीच ढोंग करत नाही. आर्जव – सरळपणा, ज्ञानी स्वभावाने सरळ असतो. कुटिलता त्याच्या ठिकाणी नसते, नम्रपणा त्याच्या ठिकाणी असतोच.

**क्षान्ति–क्षमा** – सहज करण्याचे सामर्थ्य हा क्षमेचा आशय. दुसऱ्याने अपराध केले असता, प्रतिकार न करुन ज्ञानी आत्मदंडन करतो, दुसऱ्यांना क्षमा करतो.

**आचार्य उपासना** – सद्‌गुरु सेवा केल्याने आचार्यांपासून ज्ञान प्राप्त होते.

**शौच** – पवित्रता, केवळ शारीरिक नसून मन, बुद्धी, इंद्रिये तसेच परिसर आदींची स्वच्छता, वाणीचे पावित्र्य, विचार शुद्धता, व्यवहारात शुद्धता, स्वच्छ रहाणी, व्यापार उद्योगात शुद्धता या सर्वांचा समावेश आहे.

**स्थैर्य** – स्थिरता , चांचल्याचा अभाव, सुरू केलेले शुभकार्य शेवटास नेणे, अस्थिरतेने हानी, स्थिरतेचा ज्ञानाशी निकटचा संबंध.

**आत्मनिग्रह** – संयम करणे. हे ज्ञानानेच सिद्ध होते. हे मानवी उन्नतीला अत्यंत आवश्यक आहे.

**इंद्रियभोग वैराग्य** – प्रत्येक इंद्रियाचा भोग निश्चित आहे. आपला जन्म इंद्रियांचे भोग भोगण्यासाठी आहे, हा विचार शरीराची शक्ती क्षीण करतो. मनुष्याची भोग शक्ती मर्यादित आहे. संयमित भोग घेणे आवश्यक त्यातून स्वास्थ्य लागते. समाजही सुखी होते.

**निरभिमानिता** – गर्व घमेंड आदि अभिमान होत. त्यामुळे ज्ञानाचा नाश होतो. कारण या गोष्टी अहंकाराने घडतात. अहंकाराने ईश्वराशी, जनतेशी, विश्वाशी वेगळा भाव निर्माण होतो म्हणून निरभिमान वृत्ती आवश्यक.

**जन्म–मृत्यु**, जय–व्याधी–दुःख कारक. जन्मापासून मृत्युपर्यंत जरा व्याधी दुःख आणि दोष होतात. यांचा निरास ज्ञानानेच केला पाहिजे. तारुण्य योग साधनेद्वारा टिकवता येते. मूल कारणाचा शोध घेऊन दुःखे कमी करता येतात.

**अनासक्ती** – आसक्ती न धरणे, लंपटपणा नसणे. भोगासक्तीमुळेच मनुष्य कष्टी होतो, दुःख भोगतो. स्त्री–पुत्र–गृह–अलिप्तता इथे सुद्धा प्रेमांध न होता समत्व बुद्धीने वागतो.

**इष्ट–अनिष्ट प्राप्ती** – समधित्तता–इष्ट वस्तूची सर्वच जण अपेक्षा करतात व अनिष्टापासून बचाव व्हावा असे इच्छितात. पण हे घडल्यामुळे दुःख प्राप्त होते. काहीही प्राप्त झाले तरी मनात चलबिचल होता कामा नये असा प्रयत्न केल्यास सुख लाभते. चित्त सम ठेवणे, हे ज्ञानाचे लक्षण.

**अनन्य योग** – मी पृथक्‌ नाही असे समजून आपले कर्तव्य करणे, परमेश्वर विश्वरूप आहे मी त्याचा एक अंश आहे असे समजून अखंड भावाने कर्तव्य करीत राहिण्याने मानवाची खरी उन्नती होते.

**एकांत सेवन** – आत्मपरीक्षण करणे, यासाठी एकांत सेवन करणे आवश्यक, एकांत सेवनाने चांगला अभ्यास होतो.

**जन समूहाची नावड** – एकांतवास आवडणाऱ्याला जन समूहाची आवड नसते.

**अध्यात्म ज्ञानात नित्यरुची** – आत्मज्ञानाबद्दल आवड. आपले सर्व प्रकारचे कल्याण अध्यात्मानेच होते.

**तत्त्वज्ञानार्थ दर्शन** – पृथ्वी, आप, तेज इत्यादी अनेक तत्त्वे आहेत. तत्त्वज्ञान दुःख मोचनरुप पुरुषार्थ हे आपले साध्य.

**ज्ञेय** – परमात्म विषयक ज्ञान.

मनाप्रमाणेच आसपासचा परिसरही स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाने जागरुक असायला हवे! – संत गाडगे महाराज

**विभक्तात अविभक्त** – सर्व भूतात ब्रह्म अविभक्त, तरीदेखील विभक्तासारखे भासते. भिन्नता फक्त व्यवहारापुरती. वास्तविक अभेदच. खेळणी विविध पण मूळ वस्तू लाकूड. व्यवहारात भेद, परमार्थात अभेद. विश्वात भेद अनेक परंतु परमात्मा एकरस, अखंड, मीपण त्यात एक अभिन्न हे ज्ञान होते. हे जाणले असता आनंदाचा अनुभव येतो.

**प्रकृती.** – क्षेत्र, पुरुष–क्षेत्रज्ञ. ही दोन्ही अनादी. एक आधी दुसरे नंतर अशी गोष्ट नाही. साखर व गोडी अनादी. प्रकृती पुरुष काल्पनागत भेद, वस्तुगत भेद नाही; पुरुषाची शक्ती म्हणजेच प्रकृती.

**देहात परमात्मा** – या देहातील पुरुष तोच परमात्मा मात्र अहंकार रहित झाल्यास हा अनुभव येतो.

**सर्वांची उत्पत्ती** : स्थावर वा जंगम ही प्रकृती व पुरुषाच्या संयोगाने.

**ज्ञानचक्षू** – क्षेत्र, क्षेत्रज्ञ हा भेद ज्ञान चक्षूनेच पहावा कारण हा कल्पनागत भेद आहे. वस्तुतः नाही. एकाच वस्तूचे हे दोन भाग आहेत.

संपूर्ण पदार्थ, संपूर्ण प्राणी, प्रकृतीच्या तीनही गुणांनी बद्ध आहेत. जो मानव गुणातीत होईल, तोच मूळ प्रकृतीपासून मुक्त होईल. अध्याय १४ मध्ये गुणातीत लक्षणे व उपाय सांगितला आहे. गुणांच्या आधीन राहता कामा नये. गुणांच्या अतीत होऊन गुणांचा खेळ पाहिला पाहिजे. गुणांना आपल्या आधीन केले पाहिजे. म्हणजे आपण बांधले जाणार नाही. भूत–प्रकृती मोक्ष हे साध्य करता येईल. पुढील अध्यायात या गोष्टीचा सविस्तर विचार करण्यात आलेला आहे.

**कै. शं. बा. मठ**

●●●

## नोंद



**डॉ. ज्योतिका सतीश ओझरकर**

मराठीच्या विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका आणि कवयित्री ज्योतिका सतीश ओझरकर यांचे १९ जाने रोजी कर्करोगाने निधन झाले. त्या ६१ वर्षांच्या होत्या. सीएचएम महाविद्यालयातून मे अखेरीस त्या निवृत्त झाल्या. त्यांनी झुनझुनवाला महाविद्यालयापासून अध्यापन सुरू केले. त्यांच्या मागे त्यांचे पती सतीश, मुलगा सून व मुलगी असा परिवार आहे.

डोंबिवलीतील प्रसिद्ध डॉ. पागनीस यांची नात असलेल्या त्यांचे बालपण डोंबिवलीला गेले. ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांचे निकाल सुधारावेत यासाठी विशेष व्याख्यानांची योजना त्यांनी आखली होती. कै. नी. गो. पंडितराव स्मृती वक्तृत्व स्पर्धांच्या त्या एक सल्लागार होत्या.

अध्यापन करत असतानाच 'विंदा करंदीकर यांच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर त्यांनी 'विद्यावाचस्पती' ही पदवी मिळवली. त्यांच्या या प्रबंधाला मुंबई विद्यापीठाने 'त्या वर्षातील उत्तम प्रबंध' हा सन्मान देऊन गौरविले.

●●●

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*भ्रष्टाचार या विषयावरील विवेचन या लेखात अधिक तपशिलवार केले आहे. - संपादक*

## प्रास्ताविक




दिशाच्या जानेवारी २०१४ च्या अंकात आपण ''भ्रष्टाचार'' या सामाजिक प्रश्नावर विचार केला. ''भ्रष्टाचार'' म्हणजे ''भ्रष्ट-आचार''. पण भ्रष्ट म्हणजे कुठल्या तरी एका 'सरळ' वा 'सत्य' आचारापासून विकृत झालेल्या वर्तनाला आपण 'भ्रष्ट' असे म्हणतो ना!!

## 'भ्रष्ट' याचा बीज अर्थ

पण, या पद्धतीने शब्द व त्याचा अर्थ लावणे व त्या अर्थाचा बोध होणे या क्रिया एक निराळा मार्ग दर्शवितात. सर्वसाधारणपणे, भिन्न अर्थ लावण्याच्या प्रक्रिया दोन मुख्य प्रवाहांमध्ये पहाव्या लागतील.

हे का? तर 'शब्द' ह्या संकल्पनेत केवळ मानवी ज्ञानाच्या पृष्ठभागावर असणाऱ्या क्रिया होत असतात. म्हणजे भ्रष्टाचार किंवा 'करप्शन' ह्याचा 'डिक्शनरीतील' - शब्दकोशातील अर्थ. हा अर्थ शोधताना देखील आपल्याला शब्द म्हणजे एक उच्चारलेला वैखरी पद्धतीतील ध्वनी, असा सर्वसाधारण इंद्रियांच्या मर्यादेतील बोधाचे पदार्थ आदी ज्ञान होईल. म्हणजे, त्याचे विद्युत शक्तीतील तांत्रिक कंप हा किंवा कंपनक्रियेचे ग्राफिकस्!!

पण मग मानवी समाज आजच्या क्षणाला ह्या कंपनांशी झालेल्या 'प्राणी ज्ञानाच्या' मर्यादेपलीकडे कित्येक योजने लांब व दूरवर गेला आहे.

अर्थ लावण्याच्या क्रियेमध्ये केवळ ही भौतिक जड वस्तुनिष्ठता न रहाता त्यामध्ये नैतिक, राजकीय, सामाजिक सांस्कृतिक अशा अनेक 'मानवी निर्मित ज्ञानाच्या' शास्त्रांचा संदर्भ घ्यावा लागतो.

## शब्दाचा सांस्कृतिक व सामाजिक अर्थ

ह्याला मानवी ज्ञानाच्या ऐतिहासिक ठेव्याचा अनुभव आवश्यक ठरतो. हा संदर्भ इतका विस्तृत व खोल आहे की केवळ ह्या संदर्भाच्या पर्वता एवढ्या ऐतिहासिक पौराणिक संस्कारांची आवश्यकता लागावी. पण, येथे हा विचार थांबत नाही कारण तितकाच किंवा अधिक असा आणखी एक मार्ग आहे.

पण मानवी संस्कृतीच्या ऐतिहासिक संसाराचा हा प्रवाह हा एका दोन मूलभूत प्रवाहांमध्ये विभागला गेला आहे. तो प्रवाहातील फरक मुख्यतः भौतिक व आध्यात्मिक भेदाचा होय.

---

तुम्ही एखादे काम एकदा सुरु केले की अपयशाची भीती बाळगून ते अर्ध्यात सोडू नका. जे निष्ठेनं काम करतात. ते आनंदी असतात.



हा भेद मानणारे व जाणणारे फार विरळ आहेत. मुख्यतः भौतिक विचारसरणीचे विद्वान मानव जरी आपल्या प्रचंड भौतिक ज्ञानाचा, विद्वत्तेचा व मन व बुद्धी यांचा वापर करून अर्थ निष्पत्ती लावीत बसले तरी ते एका दिव्य, गूढ व आगम अशा एका ज्ञानक्रियेच्या अर्थाला वा पर्यायाला मुकतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचा अर्थ लावण्याच्या प्रक्रियेला भौतिक मर्त्य मानवी देहाची सर्व इंद्रिये एका सीमा तत्त्वाने बांधलेली आहेत. ह्या सीमा ज्या मानवांनी इतिहासात ओलांडल्या वा संक्रमित केल्या. त्यांचे अर्थ हे फार निराळा दृष्टिकोन दर्शवितात.

**पंडित व योगी शब्द अर्थातील फरक**



त्यामुळे पंडित व योगी यांच्या विचार पद्धतीतील फरक पुढे येतो. पंडितांना 'भ्रष्टाचार' ह्या शब्दाचा अर्थ लावताना देशांतील राज्यपद्धती, आर्थिक व्यवहार, न्याय शासन वगैरे डोळ्यांसमोर येतील. इंद्रियांच्या मर्यादितील तर्कपद्धती तेथे काम करतील.

पण योगी मानवाला त्याच्या 'अंतःकरण चतुष्ट्य' ह्या न दिसणाऱ्या मानवी मनाला वा आत्म्याच्या यंत्रणेचा वापर उपयोगाला येईल.

'चित्त, बुद्धी, मन व अहंकार' ह्या चार संकल्पनामधील कृती हा योगी हाताळत असतो. त्यामुळे ह्या विश्वाच्या सृजनक्रियेमध्ये विश्वनिर्मात्याची योजना व हेतू त्याला जास्त महत्त्वाचे वाटतात. भौतिकवादी पंडित मात्र केवळ पृथ्वीवरील सध्याचे मानवी हितसंबधांचे, ध्येयांचे व शास्त्राचेच विचार डोळ्यापुढे आणतो.

**मानवाच्या वैश्विक अस्तित्वातील अर्थ**

मानवी मनाची जी घडण विश्व व्यवहारात दृष्टोत्पत्तीस येते ती एका गूढ प्रवृत्तीच्या भेदावर अवलंबून आहे. त्यात फक्त भौतिक देहाच्या हितसंबधांखेरीजही मानवाच्या आत्मिक संस्कारांचा हेतू व ध्येयांचा संदर्भ येतो. तो भेद 'सत्य, रज व तम' या त्रिगुणातील भेदांवर अवलंबून आहे. जन्मप्राप्त अशा त्रैगुणिक प्राथमिक पातळीवरील हे मानवी मन एका वैश्विक उत्क्रांति मार्गावर वाटचाल करत आहे. याचे योग्याला भान असते. ते पंडितांच्या भौतिकवादी ध्येयापासून निराळे असणारच. हे स्वाभाविक आहे!!

त्यामुळे खरा वाद हा आहे की, हे दोन मार्ग मानवी इतिहासातील ऐतिहासिक, वर्तमान व भाविष्यातील वाटचालीमधील फरकावर आधारित ध्येयवादी संघर्षात निराळे अर्थ व उपचार सुचवत असतात व ते समजल्यावर किंवा न जाणल्यामुळे मानवी समाजाची वाटचाल ही एका विचित्र रथाप्रमाणे खेच व ताण करत असताना दिसते. रथाचे घोडे हे एका सुसंगत समन्वयी मार्गाने रथ न नेता वादळात सापडलेल्या समुद्रावरील नौकेप्रमाणे हेलकावे देत जातात व नौका बुडण्याची भीती ही हा समाज प्रत्येक क्षणी भोगत रहातो.

## भौतिक संघर्षातील अज्ञान बीज

अॅटम व हैड्रोजन बॉम्ब ह्यांचा सध्याचा जागतिक साठा हा ह्या पृथ्वीला अनेकदा उध्वस्त करण्याइतका मोठा असूनही त्याचा वापर हा केवळ बहुतांशी राजकीय सत्तेच्या स्वार्थाकरिता सांभाळला जातो आहे. उत्तर कोरिया वा ईराण यांनी ही अस्त्रे निर्माण करावीत वा नाही यांचा विचार मानवी जीवनाच्या सर्वनाशाबद्दल जरी संवेदनशील असलेला दिसला, तरी हे साठे व बॉम्ब समूळ व संपूर्ण नाशासाठी का समाज व देश एक होत नाहीत?

सगळ्या धर्माचा हेतू हा कमी अधिक फरकाने आध्यात्मिक ध्येयावर आधारलेला असला, तरी कुठल्या एका धर्माच्या ह्या क्षणाला प्रचलित असणारे हेतू वा विवाद साधण्याकरिता दुसऱ्या धर्मातील मानव जीवांना मारण्यात का रस घेतात?

## मानवी मनाची अंतर्गत व बहिर्गत द्वैतावस्था

याचे एक कारण हे आहे कीं, मानवी मन हे पूर्ण पारदर्शिक पद्धतीने विचार करत नाही वा मांडत नाही तर एका छुप्या बुवाबाजीने बुद्धीच्या तर्कपद्धतीचा वापर करून असले भौतिकवादी, राजकीय व आर्थिक हेतूंचे गाठोडे सांभाळत हेतुःपुरस्पर बुद्धिभेद करून भुलवतात. त्या वासना व संघर्षाना उच्च हेतू असल्याचा दावा करतात. हे तर उघड शिसारी आणणारे वर्तन आहे. हा मानवी छुपा व्यवहार केवळ 'सत्याचा' आदर्श न ठेवल्याने होत असताना दिसतो. हे बुरखे व चेहरे उघडे व्हावयाला हवेत!!

## जीवन मूल्यांचा उगम व अर्थ

मानवी समाजाच्या पृथ्वीवरील जीवनात काही जीवनमूल्ये निर्माण झालेली आढळतात. ती कोणत्या निकषांवर वा अनुभवांवर? एक उदाहरण घेऊ या.

आपल्या प्रार्थनेत एक मंत्र आहे


''सर्वेपि सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामया।
सर्वे भद्राणि पश्युन्तु। मा कश्चित दुख माप्नुयात्।।

याचा अर्थ आपल्याला माहीत आहे. सर्वजण सुखी होऊद्यात, सर्वांना निरामय असे मन व आयुष्य प्राप्त होऊ द्या आणि या योगाने कधीही दुःख अनुभवास न येवो.

पण, ही प्रार्थना एका व्यक्तीची असूनसुद्धा तिच्या आवाक्यात सर्व समष्टी व जीवनसृष्टी वगैरे का यावीत?

कारण माणूस समजतो तसा तो एकटा, स्वतंत्रपणे म्हणजे दुसऱ्या कुणावरही कुठल्याही जीव सृष्टीशी न जोडता जीवन जगू शकत नाही. जर त्याला स्वतःसाठी व समाजाच्या स्वास्थ्यासाठी शांती सुखाची अपेक्षा असेल, तर ह्या मंत्रात सांगितल्याप्रमाणे त्याने 'सर्वांच्या' सुखाची, 'सर्वांच्या' आरोग्याची, 'सर्वांच्या' स्वच्छ, चांगल्या दृष्टिकोनाची प्रार्थना करावयाला हवी. त्या 'सर्वांच्या' सहकार्यावरच त्याचे व समाजाचे जीवन अवलंबून असते. त्यामुळे संपूर्ण समाजाचे व निसर्गाचे स्वास्थ्य हा हेतू प्रार्थनेत हवा; पण हा हेतू नुसता पोकळ आदर्शवादी, निस्वार्थी आहे. त्यामुळे स्वतःच्या अनुभवास मात्र ज्या स्वार्थी विचाराला पुरस्कार व्यवहारी जगात मिळतो व काही लोकांना लाभ होताना दिसतो, तो केवळ अनुभवात आल्याने, ही प्रार्थना निव्वळ आदर्शवादी किंवा अव्यवहारी दिसते! अनेकांना!!

## शब्दार्थामागील नैसर्गिक तत्त्वार्थ



माझ्या अनुभवात असे आले की एक अर्थशास्त्रीय विचार प्रवाहातील ॲडव्होकेट ह्यांनी हा मंत्र अव्यवहारी आहे, अशक्यप्राय आहे व त्याला सध्याच्या मानवी शास्त्रांत सिद्धान्ताचे स्थान नाही व नसणेच योग्य आहे असे ठासून प्रतिपादन केले. मला आश्चर्य वाटले!! ह्या विचाराच्या समर्थनासाठी त्याने ''इकॉनॉमिक्स'' म्हणजे अर्थशास्त्राचा आधार घेतला. त्याचा विचार असा –

''जर प्रत्येकाच्या सुखाच्या अपेक्षेची पूर्ती व्हावयाची असेल तर त्याला लागणारी ऐहिक, भौतिक सामग्री पुरी पडणे अशक्य आहे व त्यामुळेच संपत्तीचे वाटप हे मागणी, पुरवठा यांच्या नियंत्रणाच्या नियमाने होते व 'तसे' अर्थशास्त्राचे नियम 'मानवी समाजाने' निर्माण केले आहेत.''

पण, इथे प्रश्न येतो तो फार गहन व मोठा आहे.

**मानवी सुखाची व्याख्या**

प्रथम मानवी मनाची सुखाची व्याख्या एक आहे का? ती केवळ भौतिक सुखाचीच आहे वा असावी कां? पण, भौतिक सुखाची व्याख्या एका अमर्यादित भोग वृत्तीवर जर आधारलेली असेल व तसे जागतिक मानवी मन तयार झाले असेल, तर अनर्थच माजेल हे उघड आहे.




जर जगातील प्रत्येक व्यक्ती अमेरिकेतील व्यक्तींच्या पेट्रोल व मोटारगाड्या यांच्या व्यय मात्रेप्रमाणे सामग्रीचा हव्यास धरील तर पृथ्वीच्या पोटातील पेट्रोल इंधन हे केवळ ५ वर्षेच टिकेल. असा अंदाज व्यक्त केला गेला आहे. शिवाय ह्यासाठी रस्ते, पूल व शहरे यांची बांधणी एवढ्या उंचीला पोचेल की समाजाच्या इतर आवश्यक मागण्या व ही एकच अमर्यादित भोग मागणी एक भायानक असंतुलन निर्माण करील. जीवनावश्यक वस्तूंचा विसर पडून केवळ एका वस्तूच्या अमर्यादित भोगासाठी समाजाची क्रियाशक्ती व संपत्ती खर्ची पडेल. गंमत अशी आहे की, आमचे विचारवंत असे म्हणतील की याची काळजी 'अर्थशास्त्र' घेते व त्यामुळे ज्याची क्षमता जेवढी तेवढीच त्याची पूर्ती होईल असे नियम व अंमलबजावणी करण्यात येईल. याचा दुसरा अर्थ की 'डिमांड व वाँटस', गरजा व ईच्छा यामध्ये असमतोल निर्माण होईल. काहींना सुख तर बाकीच्यांना निराशा व अशांती भोगावी लागेल. याचा उघड अर्थ सुखाची व्याख्या नियंत्रित करावी लागेल. ती कुठल्या कायद्याने नव्हे तर सामाजिक मनाची बैठकच 'एकात्म' व्हावी लागेल. या शहाणपणाला त्याच्या मर्यादा पृथ्वीवरील निसर्ग संपत्तीने आखून दिलेला आहे. हा नैसर्गिक पुरवठा अमर्यादित नसून मर्यादित आहे. ह्याची जाणीव सतत ठेवायला हवी आहे. पण एक शास्त्रीय सिद्धान्त असा आहे, समजा की जर एका गुलाबजाम 'जेवढे सुख'marginal प्राप्त होते ते अंकगणिताच्या मार्गाने अनेक गुलाबजाम खाल्याने त्याच प्रमाणात हिशोबाने वाढेल, तर तसे न होता ते काही मर्यादेनंतर कमी कमी होऊन व नंतर तर जास्त सेवनानंतर दुःखही पैदा करू लागते.

या सिद्धांताचे नाव आहे. (निसर्ग निर्मित मानव निर्मित नव्हे.) "Law of Diminishing Returns" हा कायदा विश्वनिर्मित आहे. याचा सोपा सरळ अर्थ असा आहे की वस्तूच्या भोगाच्या सुखाची प्रगती ही सरळ रेषेत वाढणारी नसून तिच्या प्रत्येक वाढीव आंकड्यात एका मर्यादेपर्यंत वाढणारी राहून नंतर मात्र उतरत्या क्रमाने कमी

कमी होऊन नंतर तर दुःख प्राप्त करून देणारी होते.

हे असे का व्हावे? याचे उत्तर गणितात नव्हे तर मानवी मन व अंतःकरणाच्या नैसर्गिक निर्मितीत सामावले आहे व ते ईश्वरी विश्व नियमांच्या हेतू व मार्गाला बांधलेले आहे. तेव्हा मानवी मनाच्या जन्मप्राप्त गुणप्रवृत्तींना निसर्ग नियम एका गूढ पद्धतीने ईश्वरी हेतूंचे दर्शन घडवतो. हे सर्व जीवनाच्या भौतिक व्यवहाराला फक्त जाणणाऱ्या मानवी मनाला, ईश्वरी ज्ञानासाठी, आध्यात्मिक नैतिकतेचे शहाणपण देण्याची योजना म्हणून योजलेले दिसेल. त्यामुळे भौतिकवादी मानवी वृत्तीला आध्यात्मिक वृत्तीकडे वळवण्याची ईश्वरी योजनाच साक्षात्कारी पद्धतीने जाणवू शकेल.

### भौतिक जीवन वैश्विक सत्त्याचे ज्ञान देते

हे एकच उदाहरण नव्हे तर अशी अनेक उदाहरणे या भौतिक जीवन व्यवहारात अनुभवात येतील! गरज आहे ती, ते शहाणपण जाणण्याची व त्यासाठी मानवी समाजाचे मन अनुकूल व्हावे, या प्रयत्नांची.

एकदा का हे शहाणपण प्राप्त व्हावयाला लागले की मानवी समाज यात मार्गाने वाटचाल करू लागेल सामाजिक व्यवहाराला भौतिक व आध्यात्मिक नीतीनियमांच्या समन्वय पातळीवर आचार, विचारांची जीवनमूल्ये आखली जातील, जाणली जातील व असा 'सामाजिक आचारधर्म' निर्माण होताना व जपताना आढळेल. या विरुद्ध वर्तन तो 'भ्रष्टाचार' असा अर्थ प्राप्त होईल.

### भ्रष्टाचाराची खरी बैठक

त्यामुळे 'भ्रष्टाचाराची' खरी पूर्ण बैठक ही केवळ एकांगी भौतिकवादी विचारावर आधारलेली न रहाता, ती 'एकात्म जीवनावर'आधारलेली म्हणजे भौतिक व आध्यात्मिक एकात्म वृत्तीवर (Integral Spirituality) आधारलेली बनेल.

याचा सरळ अर्थ हा की 'भ्रष्टाचारी वर्तनाची' व्याख्या ह्या नवीन आध्यात्मिक स्पिरीच्युअल पातळीवर केल्याखेरीज, आपल्या सर्व समाजाला ज्या भयानक रोगाने ग्रासले आहे, तो त्या **'भ्रष्टाचाराचा' 'आत्मसंस्कारित अर्थ'** होईल तेव्हाच त्याचा नायनाट होऊ शकेल.

हे जोपर्यंत जाणले जाणार नाही तोपर्यंत कुठल्याही अज्ञानी मानवी भौतिकवादी पद्धतीची राजकीय, आर्थिक व न्यायालयीन पद्धतीच्या कायद्याच्या सुधारणा 'भ्रष्टाचाराचे' निर्मूलन करू शकणार नाहीत.

### मानव निर्मित भौतिक चौकट

थोडक्यात, ज्या भौतिकवादी एकांगी बैठकीवर आपली राज्यघटना, पार्लमेंट व लोकशाही यंत्रणा एका चौकटीत हा बदल घडवू इच्छिते ते शक्य नाही. हा आध्यात्मिक ज्ञानावर आधारलेला भौतिक बदल आवश्यक आहे व त्याला तरणोपाय नाही.


### स्पिरीच्युॲलिटी व भ्रष्टाचार

या लेखाचा हेतू आहे की तो "Intergral Spirituality" म्हणजे Individual Soul (जीवात्मा), Group Soul (सामाजिक व नैसर्गिक समूहाचा आत्मा) यांच्या 'एकात्म' संकल्पनेवर आधारलेल्या तत्त्वावर आधारलेला आहे. आपल्या व्यवहारातील भौतिकवादी व मानवी विचार व तर्कपद्धतीवर आधारलेल्या प्रश्नांची उकल कशी करावी.




एका झाडातून माचिसच्या एक लाख काड्या तयार होऊ शकतात...आणि माचिसची एक काडी एक लाख झाडे जाळू शकते.

या दोन पद्धतीतील फार मोठा फरक जाणवणे व त्यातील वैश्विक सत्य जाणणे हा आगम शास्त्राचा व योगाचा विषय आहे. त्यावर निराळी चर्चा व मांडणी योग साधना व तंत्र वगैरे पद्धतीने करावी लागेल.




पण या लेखात ह्या विषयाबद्दल थोडी उत्सुकता जागृत झाली, तरी यश मिळाल्याचे समाधान मला मिळू शकेल!! हा बदल न झाल्यास 'भ्रष्टाचार' समाजाचे रक्त पिऊन टाकेल. हा बदल आध्यात्मिक बैठकीवर व योगिक तंत्रावर आधारलेला असावा लागेल. ह्या विश्वासाने मी लिहितो आहे!!

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**०२२-२५४२ ६२७०**

## *'गीता' - दृष्टी देणारा ग्रंथ*

आजूबाजूची परिस्थिती बदलली असली तरी बदललेला नाही तो म्हणजे माणूस व त्याचे स्वाभाविक गुणदोष! प्रेम, आपुलकी, स्नेह याबरोबरच सत्तेची व द्रव्याची हाव, द्वेष, सूडभावना आणि त्याचबरोबर माणसाचा शाश्वत सुखाचा शोध, ज्ञानाची लालसा, विश्वाचा कारभार चालवणाऱ्या जगन्नियंत्याविषयी वाटणारी ओढ व कुतूहल या गोष्टीही आहेतच. म्हणूनच साडेतीन हजार वर्षांपूर्वी सांगितलेली गीता आजही तितकीच महत्त्वाची ठरते.

**- संग्रहातून**

●●●

## मंगळावर स्वारी

**- राहून गेलेली नोंद**

*मंगळाच्या दिशेने अवकाश यान यशस्वीरीत्या सोडून भारताने एक नवा इतिहास निर्माण केला आहे. सारा देश दिवाळीचा आनंद घेत असतानाच आपल्या पीएसएलव्ही सी ५ या यानाने अंतरिक्षामध्ये झेप घेतली आणि अवकाशविज्ञानात आपण अमेरिका, रशिया व युरोपीय समूदाय यांच्या बरोबरीला पोचत आहोत, ही गोष्ट ठळकपणे अधोरेखित केली. इस्त्रो ही संस्था आणि त्यामध्ये गेले जवळपास दीड वर्ष अथकपणाने काम करणारे संशोधक आणि तंत्रज्ञ यांनी साऱ्या देशाची मान आज जगामध्ये उंच केली आहे. या यशामुळे जगामध्ये भारत हा अवकाशविज्ञानामध्ये एक प्रमुख देश असल्याचे सिद्ध झाले आहे.*

**- संग्रहातून**

●●●

# अनाम प्रेम

*अनेक प्रकारची संमेलने समाजात होतात; परंतु हिजड्यांचे संमेलन हा विचार वेगळाच आहे. अनाम संस्थेसारख्या संस्थांची माहिती मिळवून त्यांची ओळख करून देणे हे ही एक समाज सेवेचे काम आहे. हा विचार आपण ही करावा– संपादक*

८ जून २०१३ च्या 'चतुरंग' मधे 'एक टाळी' (मेलेल्या मनाला जगवणारी) हा गीतांजली राणे यांचा तृतीय पंथियावर लिहिलेला लेख वाचनात आला. पत्रकारितेच्या लघुशोध निबंधासाठी तृतीय पंथियांविषयी लिहिण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी प्रत्यक्ष तृतीयपंथियांना भेटून त्यांच्या समस्या, त्यांचे जीवन समाजाकडून त्यांना मिळणारी हीन, उपेक्षित वागणूक वगैरे सर्वांचा सर्वांगाने अभ्यास करून त्यावर अभ्यासपूर्ण लघुनिबंध लिहिला व तो 'चतुरंग' ने सर्वांपुढे मांडला. माझाही एक अनुभव सांगते–

एक दिवस 'अनाम प्रेम' या संस्थेकडून मला फोन आला.''आमची संस्था समाजातील दुर्लक्षित, उपेक्षित घटकांसाठी कार्य करते. आतापर्यंत आम्ही पोस्टमन, हमाल, रिक्षावाले, ड्रायव्हर, कंडक्टर या दुर्लक्षित, उपेक्षित घटकांसाठी कार्य केले आहे. यावेळी आम्ही 'हिजडा' (तृतीयपंथी) या दुर्लक्षित, उपेक्षित घटकाचे संमेलन १५–१६–१७ नोव्हेंबरला (२०१२) गोव्यातील पणजी येथे घ्यायचे ठरवले आहे. तरी या संमेलनाला तुम्ही आमच्याबरोबर यावे ही इच्छा आहे. सुप्रसिद्ध गुजराथी लेखक दिनकर दोषी हे संमेलनाला उपस्थित राहणार आहेत. तरी आपणही यावे.''

मी विचारले,'' मला कशासाठी बोलवीत आहात? या संमेलनाला?'' ''एक लेखिका म्हणून या हिजड्यांच्या समस्या, त्यांची दुःखे जाणून घ्या व त्याद्वारा जनजागृतीसाठी लेख लिहा'' मी त्यांना विचारले,''माझा फोन नं. कुठून मिळाला तुम्हांला?'' 'महाराष्ट्र मराठी पत्रकार संघाकडून'. नंतर त्या माझा पत्ता विचारून भेटीची वेळ वगैरे ठरवून त्या संस्थेच्या त्या स्त्री कार्यकर्त्या माझ्या घरी बोलावणे करायला आल्या.

पण त्या लेखात लिहिल्याप्रमाणेच समाजाची 'हिजडा' तृतीयपंथियांविषयी किळस, घृणा, भीती वगैरे जी भावना आहे, तशीच माझ्याही मनात होती. त्यामुळे या लोकांच्या संमेलनाला गोव्याला तेही 'अनाम प्रेम' या प्रथमच नाव ऐकलेल्या संस्थेबरोबर जाण्यास मन धजावेना. ते दिवस तर दिवाळीचे असणार होते. म्हणून मी पटकन ''मला नाही जमणार यायला'' असे सांगितले. मुंबईत असेल तेव्हा येईन, असे मोघम उत्तर दिले. नंतर तो विषय डोक्यातून पार निघून गेला.

पण 'अंतर्नाद' जून २०१३ मधे 'आमचा काय दोष?' 'तृतीयपंथियांच्या अंतरीची व्यथा' हा मूळ गुजराती लेख. दिनकर दोषी, मराठी अनुवाद, सुषमा शाळिग्राम यांचा लेख वाचला नि त्यातून 'अनाम प्रेम' या संस्थेविषयी माहिती कळली. (मला याच संस्थेने बोलावले होते. श्री. दोषी येणार हे सांगितले होते सगळे आठवले.)

'अनाम प्रेम' ही संस्था मुंबईच्या कांदिवली भागात राहणारे एक आजोबा चालवतात. वय वर्षे पंचाहत्तर. 'प्रेमाचा' पसार करण्यासाठी हे आजोबा गेली काही वर्षे धडपड करीत आहेत. प्रेम म्हणजे केवळ प्रेम; त्याला दुसरे नाव नसतेच, म्हणून त्यांचे हे अभियान 'अनामप्रेम' ओळखले जाते. 'अ' हे आद्याक्षर परमपिता विधात्याचे सूचक आहे; म्हणून 'अनाम प्रेम' म्हणजे परमात्म्याबद्दलचे प्रेम. ना कोणती अपेक्षा ना स्तुती ना प्रार्थना. असते एकच

नव्या बादलीतून पाणी गळत तर नाही ना, याची खात्री होईपर्यंत जुनी बादली फेकून देऊ नये.

गोष्ट, प्रेमात 'स्व' ला विरघळवून टाकणे. याचेच नाव अनाम प्रेम. निरपेक्ष, अत्यंत समर्पित भावनेने काम करणारे अनेक सहकारी या आजोबांना लाभले आहेत. हे आजोबा म्हणजे सुभाष देसाई नावाचे मराठी गृहस्थ. ते निवृत्तीपूर्वी मॅजिस्ट्रेट व नंतर न्यायाधीशही होते.

हॉस्पिटलात आस्थेने, प्रेमाने आपुलकीने सर्वांची रुग्णांची सेवा करणाऱ्या परिचारिकांचा सत्कार आजोबांनी नवरात्री उत्सवात केला. नवरात्री म्हणजे आंबा मातेचा उत्सव परिचारिका पण मातेच्या ममतेने रुग्णांची सेवा करणाऱ्या माताच. म्हणून इंजिन ड्रायव्हर, बस ड्रायव्हर, ज्येष्ठ नागरिक, मानसिक तसेच शारीरिक विकलांग या सगळ्यांना कोणत्या ना कोणत्या सणावाराला भेटून त्यांच्या सेवांची जाण ठेवून, त्यांच्याबद्दल प्रेमभाव व्यक्त करण्याचे कार्य हे आजोबा आयत्या सहकाऱ्यांसह गेली दहा वर्षे नियमितपणे करीत आहेत. कोणाकडूनही कोणत्याही प्रकारच्या देणग्या न घेता.

आपण पाखरांना दाणे, मुंग्यांना साखर, कुत्र्याला भाकरी, गाईला चारा घालतो. पण आपणच जन्माला घातलेल्या माणसासारखी जिवंत माणसे असलेल्या हिजड्यांची मात्र आपण उपेक्षा करतो. दलितांना समाज मान्यता मिळाली. पण हिजड्यांना समाज स्वीकृत करण्यासाठी अजून कोणी सुधारक पुढे आलेला नाही. मतदार यादीत त्यांचा समावेश नाही. दलितांना आंबेडकरांसारखा नेता लाभला, पण हिजड्यांचा वाली कोण?

दिनकर दोषी यांच्या या लेखासारखा लेख लिहिण्यासाठी 'अनाम प्रेम' संस्थेने मला त्या गोव्याच्या 'हिजडा' संमेलनाला आमंत्रित केले होते. पण या संस्थेविषयी मला काहीच माहिती नसल्यामुळे 'हिजडा' संमेलनाला जाण्यास मी नकार दिला. हे पोस्टमन, परिचारिका, इंजिन ड्रायव्हर यांचे संमेलन असते, तर मी गेलेही असते कदाचित.

पण 'अंतर्नाद' जून १३ मधला 'आमचा काय दोष?' हा तृतियपंथीयांवरचा दिनकर दोषी यांचा अनुवादित लेख वाचला. नि न गेल्याबद्दल मनाला हळहळ वाटली. मनात आले 'अनाम प्रेम' या अपरिचित संस्थेच्या निःसीम कार्याची सर्वांना माहिती करून द्यावी. 'चतुरंग' मधल्या 'एक टाळी' या लेखामुळे मलाही माझा अनुभव सांगावा असे वाटले. त्या 'अनाम प्रेम' संस्थेला सलाम. मानाचा मुजरा.

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी – २५४१०१४०
भ्रमणध्वनी – ९३२४०४४७६४

●●●

## *माध्यमांचा प्रभाव*

जगात कुठलाच माणूस दानव नसतो. परिस्थितीमुळे, गैरसमजामुळे किंवा अन्य कुठल्या कारणाने तो दुष्ट कृत्य करतो, त्यामुळे मानवी खलप्रवृत्तीचा इतका भडक आविष्कार प्रसारण माध्यमांनी थांबवायला हवे.

माणूसपणाचा वेध घेऊन माणसासाठी माणूस घडविणारा, जागवणारा ध्यास प्रसारमाध्यमांनी घेतला तर भारताचे, पर्यायाने जगाचं नंदनवन व्हायला वेळ लागणार नाही, इतकी शक्ती या माध्यमात आहे.

# साहित्य - जगत

*साहित्य-जगत / पुस्तक परिचय या लेखांमध्ये अनेक पुस्तकांचा परिचय आम्ही देतो. आपल्या वाचनात असे अविस्मरणीय पुस्तक आले तर त्याचा परिचय पाठवावा; योग्य वाटल्यास दिशाच्या अंकात घेऊ - संपादक*

## रोहन प्रकाशनास पि. पु. भागवत पुरस्कार

रोहन प्रकाशन संस्थेच्या ३० वर्षाच्या एकूण वैशिष्ट्यपूर्ण वाटचालीसाठी मुंबई मराठी साहित्य संघातर्फे देण्यात येणारा पि. पु. भागवत पुरस्कार नुकताच 'रोहन प्रकाशन' ( धवलगिरी, शनिवार पेठ, पोलीस चौकीसमोर, पुणे - ४११०३०, फोन नं.पुणे-०२०/२४४८०६८६, मुंबई-०२२/२३८९२३७८, मो.९८६९११८७६२) या प्रकाशन संस्थेस सुप्रसिद्ध साहित्यिक अचल जोशी ('ज्ञानमयी रुद्र'कार-न. र. फाटक यांचे चरित्र) यांच्या हस्ते देण्यात आला. रोहन प्रकाशनाचे संचालक प्रदीप चंपानेरकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. मानपत्र, पाच हजार रुपये रोख आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

हा पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रकाशक प्रदीप चंपानेरकर यांनी आपल्या मनोगतात रोहन प्रकाशन संस्थेची वाटचाल उलगडून सांगितली. भविष्यातील आव्हानांविषयी बोलताना यापुढे मराठी प्रकाशकांनी ई-बुक्ससाठी सज्ज राहिले पाहिजे, असा कानमंत्रही त्यांनी दिला. केशव भिकाजी ढवळे (गिरगाव, मुंबई-४) या संस्थेतर्फे देण्यात येणाऱ्या पुरस्कारांचेही यावेळी वितरण करण्यात आले. संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश (खंड १ व २ वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश) तयार करणारे सुरेश वाघ, मराठी अभ्यास केंद्राचे प्रमुख डॉ. दीपक पवार आणि दूरदर्शनचे निर्माते रवीराज गंधे यांना ढवळे प्रकाशनातर्फे विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अचला जोशी यांनी या प्रसंगी वि. पु. आणि श्री. पु. भागवत तसेच बा. गं. ढवळे यांच्या आठवणी सांगितल्या.

## रोहन प्रकाशन

रोहन प्रकाशनाचे ब्रीदवाक्य आहे. 'घराला समृद्ध करणारी पुस्तकं!' पुस्तक प्रकाशित करणं, पुस्तकांद्वारे विविध विषय, विश्वसनीय माहिती, सर्वंकष ज्ञान योग्यरीतीने जास्तीत जास्त वाचकांपर्यंत कसे पाहोचवता येतील याचा विचार रोहन प्रकाशनाने नेहमीच प्राधान्याने केला आहे.

१९८२ मध्ये रोहन प्रकाशनाची स्थापना होऊन १९८३ च्या जानेवारीत 'जगावेगळी माणसं' हे पहिले पुस्तक प्रकाशित झाले आणि वेगळ्या वाटचालीला सुरुवात झाली. सुरुवातीपासूनच रोहन प्रकाशनाने मराठी भाषेतील विविध विषयांतील व क्षेत्रांतील (उदा. साहित्य, सामाजिक, राजकीय वैयक्तिक आरोग्य, कला , पाककला ) अशा पुस्तक निर्मितीवर भर दिला. त्याच बरोबर इंग्लिश भाषेतील काही गाजलेल्या व काही अभ्यासपूर्ण पुस्तकांचा अनुवादही रोहनने मराठीत आणला आहे.

'रोहन प्रकाशन'ने घरातील सर्वांच्याच आवडी-निवडी व गरजा लक्षात घेऊन पुस्तकं प्रकाशित केली आहेत; म्हणूनच विषयांची विविधता राखणारी प्रकाशन संस्था म्हणून रोहन प्रकाशन नावारूपाला आले. विविधतेबरोबरच मजकूराचे सांक्षेपी संपादन व वाचकांना सोयीस्कर ठरेल अशी पुस्तकांची मांडणी ही प्रकाशनाची वैशिष्ट्ये आहेत आणि त्याला जोड आहे ती उत्कृष्ट व आकर्षक निर्मितीमूल्यांची तसेच माफक किंमतींची म्हणूनच ही पुस्तकं इतर प्रकाशनापेक्षा वेगळी उठून दिसतात.

'रोहन'ला आतापर्यंत उत्कृष्ट साहित्य व पुस्तक

---

निवडणुका आणि युद्धे येतात-जातात. इतिहास मात्र घडत असतो तो सामान्य माणसांच्या रोजच्या अथक श्रमांनी-बार्बरा किंग्जऑल्वहर

निर्मिती राजय व राष्ट्रीय पातळीवरील अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यामुळेच 'रोहन'ला ख्यातनाम प्रकाशकांच्या यादीत गणलं जात.

रोहन प्रकाशनाचं मुख्य कार्यालय मुंबई शहरात आहे. कोल्हापूर, नागपूर इथे वितरणासाठी प्रतिनिधी कार्यरत असून संपूर्ण महाराष्ट्र व बेळगाव-गोवा येथे पुस्तक मोठ्या प्रमाणात नियमितपणे वितरित केली जातात.

अर्थात गेली तीन दशकं रोहन प्रकाशनाचा सर्व दृष्टिकोनातून साध्य झालेला चढता आलेख जाणकार वाचकांच्या सातत्यपूर्ण प्रतिसादामुळेच शक्य झाला आहे. यापुढे वाचकांना उत्तमोत्तम पुस्तक देण्यास रोहन प्रतिबद्ध आहे.

**रोहन प्रकाशनाची पुस्तके**

आजवर रोहन प्रकाशनाने सुमारे ४०० पुस्तके प्रसिद्ध केलेली आहेत. त्यांतील 'यांनी घडवलं सहस्त्रकं' (सुहास कुलकर्णी, मिलिंद चंपानेरकर), 'लाल बहादुर शास्त्री' (मूळ लेखक सी. पी. श्रीवास्तव अनु अशोक जैन) 'कृष्णाकाठ' (जैन आवृत्ती) यशवंतराव चव्हाण, वॉर्ड नं.५, केईएम (डॉ. रवी बापट), 'विनोद, विनोद आणि विनोद' (आनंद घोरपडे), 'हास्यपाठ' (भा. महाबळ) 'असा घडला भारत' (मिलिंद चंपानेरकर, सुहास कुलकर्णी) 'नोबेलकथा' (डॉ. प्रबोध बोघे) 'सममाणेकशी' (मेजरजयरल(निवृत्त) शुभी सूद-अनु भगवान दातार फील्ड मार्शल ऑपरेशन ब्लू स्टोर (जसं घडल तस) ले. जेन. के. एस. बार - अनु भगवान दातार इ. अनेक पुस्तके गाजलेले आहेत. रोहन प्रकाशनाचे अभिनंदन !

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

## *समर्थांचा बोध*

२६ फेब्रुवारी दासनवमी आहे, त्यानिमित्ताने समर्थांचे हे स्मरण

बरे सत्य बोला यथातथ्य चाला।
बहु मानिती लोक येणें तुम्हांला।
धरा बुद्धि पोटीं विवेकी मुलें हो।
बरा गूण तो अंतरामाजि राहो।।१।।

सदा दात घांसोनि तोंडा धुवावे।
कळाहीन घाणेरडे बा नसावे।
सदा सर्वदा यत्न सोडूं नको रे।
बहूसाल हा खेळ कामा न येरे।।२।।

दिसामाजि कांहींतरी ते लिहावें।
प्रसंगी अखंडीत वाचीत जावें।
गुणश्रेष्ठ ऊपास्य त्यांचे करावें।
बरे बोलणें सत्य जीवीं धरावें।।३।।

प्रचितीविणें बोलणें व्यर्थ वायां।।
विवेकेंविणें सर्वही दंभ जाया।
बहू सज्जला नेटका साज केला।
विचारेंविणें सर्वही व्यर्थ गेला।।४।।

सदा अंतरी गोड तें सांडवेना।
कदा अंतरी वोखटें देखवेना।
म्हणोनी बरो गूण आधीं धरावा।
महाघोर संसार हा नीरसावा।।५।।

भला रे भला बोलती तें करावें।
बहुतां जनांच्या मुखें येश घ्यावें।
परी शेवटी सर्व सोडोनी द्यावें।
मरावें परी कीर्तिरूपे उरावें।।६।।

।।जय जय रघुवीर समर्थ।।

**- संकलित**

●●●

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

- शनिवार दि. २३/११/२०१३ रोजी लहान व मोठ्या शिशुची दुसऱ्या सत्रातील पालक सभा घेण्यात आली.
- सोमवार दि. २५/११/२०१३ व मंगळवार दि. २६/११/२०१३ रोजी लहान व मोठ्या शिशुच्या स्पर्धा घेण्यात आल्या.
- लहान शिशु मुले – वर्तुळावर बिल्ले लावणे
  मुली – शेंगभाज्या ओळखून वेगळ्या करणे
- मोठा शिशु–मुले – ग्लासचा मनोरा रचणे
  मुली – छोट्या चिमण्यांची साखळी करणे
- शुक्रवार दि. २०/१२/२०१३ रोजी पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेह संमेलन झाले. प्रमुख पाहुणी म्हणून आपल्याच शाळेची विद्यार्थिनी कु. सेजल संदीप जगताप (इ. ६वी) हिला बोलावले हो. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्या प्रसारक मंडळाच्या सभासद मा. सौ. अल्पना बापट यांनी भूषविले. सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मोठ्या शिशुच्या मुलांनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले. मराठी भाषा, तिची संस्कृती व संस्कार हे लोप पावत चालले आहेत. आपण सर्वांनी मराठी भाषेसाठी सतत झटले पाहिजे. हल्ली ज्ञानदानापेक्षा विद्यार्थ्यांना अकार्यक्षम बनविण्यात टी.व्ही वाहिन्या आघाडीवर आहेत आणि हे कोवळ्या मनावर होणारे आघात आहेत. ते कुठेतरी थांबलेच पाहिजेत असे सांगून आपल्या काव्यमय पंक्तीनी पू. प्रा. वि. च्या मुख्याध्यापिका वैद्यबाई यांनी आपले प्रास्ताविक सादर केले.

आमचीच आहे शाळा
आमचीच राहणार
प्रगतीच्या पथावर
नेहमीच सळसळणार
पाण्यासमे नेहेमी
पुढेच जाणार
पाऊल कधी मागे
नाही फिरणार
शिक्षक विद्यार्थी हा संगम
दिसतो शाळेत जनांना
शाळा एकच असते
जी वाव देते आपल्या गुणांना.

प्रास्ताविकानंतर प्रमुख पाहुणी कु. सेजल जगताप हिची मुलाखत मोठ्या शिशुची कु. दिपाली विकास ढोके व कु. सार्थक मच्छिंद्र आढाव यांनी घेतली. 'गोऱ्या गोऱ्या गालावरी...' या गाण्यावरती प्रमुख पाहुणी कु. सेजल जगताप हिने अतिशय सुंदर नृत्य सादर केले. स्नेहसंमेलनाचा ह्या वर्षीचा विषय 'जनकवी – पी. सावळाराम' यांच्या गाण्यावर आधारित होता.

१. आज शिवाजी राजा झाला...
२. लेक लाडकी...
३. गोड गोजिरी...
४. कशी झोकात चालली... इ. गाणी लहान व मोठ्या शिशुच्या मुलांनी सादर केली.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. कला चिल्ड्रन ॲकॅडमीतर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण व हस्ताक्षर स्पर्धेत सर्व मुलांना प्रमाणपत्रे मिळाली. रंगभरण स्पर्धा–१० मुलांना व हस्ताक्षर स्पर्धा–२ मुलांना सुवर्णपदके मिळाली.

---

डोक्यावर बोजा असेल, तेव्हाच हमालाला देव आठवतो! – अरबी म्हण

• 'सर्व शिक्षा अभियानातर्फे' नवउपक्रम म्हणून 'मुलींचे शिक्षण' हा उपक्रम व त्याबाबत जनजागृतींसाठी, शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर २०१३ हा दिवस 'आंतरराष्ट्रीय कन्या दिवस' म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

• गतवर्षीप्रमाणे या ही वर्षी शिक्षण अधिकार अभियान अंतर्गत देशाचे पहिले शिक्षणमंत्री 'मौलाना अबुल कलाम आझाद' यांचा ११ नोव्हेंबर हा जन्मदिवस 'शिक्षण दिन' म्हणून सोमवार दि. १८ नोव्हेंबरला शाळेत साजरा करण्यात आला. त्याच दिवशी 'बालदिन' ही साजरा केला. इयत्ता ४ थीच्या विद्यार्थ्यांची 'नेहरुंच्या जीवनावरील एक प्रसंग' ही निबंधस्पर्धा घेण्यात आली.

• द्वितीय सत्रात, नोव्हेंबर महिन्यात इ.१ ली व इ.२ रीची शैक्षणिक सहल 'केशवसृष्टी' व इ. ३ री व इ. ४ थी ची शैक्षणिक सहल 'नेहरू तारांगण' येथे जाऊन आली. शनिवार दि. १४/१/२०१४ रोजी शाळेचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साही वातावरणात साजरे झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सदस्य व कोषाध्यक्ष श्री. मा. य. गोखले यांनी भूषविले. तर कार्यक्रमास डॉ. अरुंधती भालेराव ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. उभयतांच्या हस्ते गुणी व बक्षिसप्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

• प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीसुद्धा आगळा वेगळा विषय घेऊन विद्यार्थ्यांनी बहारदार कार्यक्रम सादर केले. सदर कार्यक्रमाचा आस्वाद इ. १ ली ते इ. ४ थीच्या सर्व पालक व निवृत्त ज्येष्ठ शिक्षिकां समवेत माननीय सौ. सुमेधा बेडेकर यांनी घेतला व कार्यक्रमातील विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

• इयत्ता ४ थी ५ वी मध्ये शिकणारा कुमार सुमित सं. पाटील ह्या विद्यार्थ्याला ठाणे डिस्ट्रिक्ट सबज्युनिअर ज्युडो चॅम्पिअनशिप ह्या स्पर्धेत रौप्यपदक प्राप्त झाले. तसेच इयत्ता २ री मध्ये शिकत असलेला विद्यार्थी कु. मिथिलेश सचिन भोईर याने जिल्हा पातळीवर कराटे चॅम्पिअनशिपमध्ये गोल्ड व सिल्व्हर मेडल प्राप्त केले. विद्यार्थ्यांच्या या यशाचे शाळेकडून कौतुक करण्यात आले.

• 'कला चिल्ड्रन ॲकॅडमी' तर्फे घेण्यात आलेल्या रंगभरण, चित्रकला, हस्ताक्षर व निबंध लेखन स्पर्धा यांमध्ये पुढील विद्यार्थ्यांना 'कलारत्न' पुरस्कार प्राप्त झाला. इयत्ता २ री–श्रावणी रा. चव्हाण, भाग्यश्री ना. निकम, निहार गं. सातर्डेकर, रोहिणी म. गोगावले, सावनी संदीप पाष्टे, पूर्वा सत्यवान रावराणे, सुयश शं. धुरत.

इयत्ता १ ली – हर्ष वि. जाधव, सुश्मिता न. दहिहंडे

इयत्ता ३ री – तनिष्क र. व्यास, रुजुज नि. मोरे,
भूमी शंकर तूपकर

इयत्ता ४ थी – श्रेयस व. घारगे, श्रुतिका रा. पर्शराम, सानिका सं. दळवी, आदित्य र. मोरे, तन्मय ह. मांडवकर, ओम सं. उतेकर, शुभम दे. मांडवकर, सिद्धी रा. पंडम, लक्ष्मी स.परब.

या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेकडून अभिनंदन करण्यात आले. या सर्व स्पर्धांमध्ये शाळेतील ५०० ते ६०० विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. तसेच शाळेस 'कृतिशील शाळा' हा बहुमान देऊन गौरविण्यात आले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**के. जी. चे नेत्रदीपक यश**

२०१३ वर्ष सरता सरता पूर्व प्राथमिक विभागाला नेत्रदीपक यश देऊन गेले. यावर्षी प्रथमच आमच्या विभागातर्फे एक हिंदी नाटक 'नटखट नंदलाल' आंतरशालेय नाट्यस्पर्धेत सादर झाले. संस्कृती कलादर्पण तर्फे आयोजित या स्पर्धेत आमच्या नाटकाला तीन विविध सन्मान मिळाले.

१. प्रथम क्रमांकाचे नाटक – 'नटखट नंदलाल'
२. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन – सौ. योगिता नाईक
३. सर्वोत्कृष्ट नायिका – कु. आदिती बेहेरे (सिनिअर के.जी.)

- दरवर्षी वार्षिक स्नेहसंमेलनात आमच्या शाळेच्या एका शिक्षकाला 'सर्वोत्कृष्ट शिक्षका'चा पुरस्कार दिला जातो. या वर्षी हा सन्मान के.जी. विभागाच्या प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांना देण्यात आला.
- चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांमधील एका व्यक्तीला त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल सन्मानीत केले जाते. यावर्षी हा सन्मान सुद्धा आमच्या विभागाच्या वासंती मावशींना दिला गेला.

जाता जाता सन २०१३ ने के.जी. विभागाला घवघवीत यश मिळवून दिले.

**दुसऱ्या सत्रात आयोजित केलेले उपक्रम**

**सहल** – २१ नोव्हेंबर २०१३ रोजी पूर्व प्राथमिक विभागाच्या दोन्ही गटांची एकत्रित सहल 'हॅपी प्लॅनेट' कांजुरमार्ग, मुंबई येथे नेण्यात आली. सकाळी ८.४५ वा. मुलांना शाळेत येण्यात सांगितले होते. मुले वेळेच्या आधीच तयारी करुन उत्साहात शाळेत आली. सर्वांच्या हजेरीनंतर सर्वजण बसमधे चढले. उत्साहात गाणी म्हणत सहलीला निघाले. काही अंतर पार केल्यावर ब्रेड, बटर आणि फ्रुटी असा नाश्ता मुलांना दिला गेला. थोड्याच वेळात नियोजित ठिकाणी आम्ही पोहोचलो. एका मोठ्या सभागृहात सामान ठेवून सर्व मुले खेळायला गेली. हवेने फुगवलेली अतिशय सुरक्षित रबरी खेळणी, छोटी आगगाडी, चेंडूचे खेळ इ. खेळण्यांशी मुले मनसोक्त खेळत होती. दुपारी १।। वाजता रांगेने बसवून त्यांना पावभाजी, पिझ्झा व आइस्क्रीम असा त्यांच्या आवडीचा बेत जेवणासाठी होता. यानंतर मुलांनी 'शिवाजी म्हणतो' सारखे बैठे खेळ खेळले. नंतर मुलांनी नृत्याचा मनसोक्त आनंद लुटला. दुपारी ३ वाजता परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली. दिवसभर भरपूर खेळून, मजा करून दमलेली मुले ४ वाजता पालकांबरोबर घरी गेली.

**बाजारहाट** – मुलांना व्यवहार करता यावेत यासाठी त्यांना चलनातील विविध नाणी तसेच नोटांची तोंडओळख अभ्यासक्रमात करुन दिली जाते. याचाच एक भाग म्हणून बाजाराचे आयोजन केले जाते. सिनीयर के. जी. चे विद्यार्थी यासाठी भेटवस्तू, भेटकार्डे, पाकिटे इ. गोष्टी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार करतात. के. जी. मधील काही मुले दुकानदार होतात. मुले व सर्व ज्युनियरची मुले गिऱ्हाईकाची भूमिका पार पाडतात. बाजारातील वस्तूंची किंमत विचारून पाकिटातून योग्य पैसे काढून दुकानदारांना देण्याची मुलांना फारच गंमत वाटते. आमच्या छोट्या दुकानदार तसेच गिऱ्हाईकांनी त्यांच्या पालकांबरोबर ह्या बाजाराचा आनंद घेतला.

**नाताळ** – ख्रिस्ती बांधवांचा २५ डिसेंबरला येणारा नाताळ २४ डिसेंबर रोजी शाळेत साजरा केला गेला. प्रवेशद्वाराजवळ चांदण्या आणि ख्रिसमसचे सजवलेले झाड लावले होते. यासंबंधातील चित्रांनी, तक्त्यांनी व्हरांडा सजवला होता. रंगीबेरंगी कपडे घालून आमची चिमुकली हे सर्व आश्चर्याने पहात होती. सिनियर के. जी. चा एक मुलगा छोटा सांताक्लॉज तर एक शिक्षिका मोठा सांताक्लॉज बनून आले. सर्व मुलांबरोबर दोनही सांताक्लॉजनी गाणी म्हटली, नाच केला. तसेच मुलांना केकचा गोड खाऊसुद्धा वाटला. या सणासंबंधीचे एक चित्र मुलांनी सुंदर रंगवले, ज्युनियर के. जी. च्या मुलांना ख्रिसमसचे झाड तर सिनीयरच्या मुलांना सांताक्लॉज, झाड व भेटवस्तू असा देखावा रंग भरण्यास दिला गेला. मुलांनी आपल्या कल्पना शक्तीने ही चित्रे रंगवली.

**क्रीडादिन** – यावर्षी ३१ डिसें.२०१३ रोजी क्रीडादिन साजरा करण्यात आला. मुलांचे वय, क्षमता लक्षात घेऊन

साधे सुटसुटीत खेळ निवडले गेले. ज्युनियर के. जी. साठी धावणे व अडथळ्यांची शर्यत तर सिनियरसाठी धावणे आणि चमचा मणी शर्यत घेतली. सर्व स्पर्धांसाठी प्रत्येक गटाचा एक विजेता निवडला गेला. दिवसभर फक्त खेळ या विचाराने मुलं फारच आनंदात होती. शिक्षकांच्या सूचना ऐकून त्याप्रमाणे खेळून मुलांनी स्पर्धांचा आनंद लुटला. आपले इतर मित्र-मैत्रिणी खेळताना त्यांना प्रोत्साहित करणारी मुले फारच उत्साहात होती. स्पर्धा म्हटली तरी ती फक्त नावालाच. सर्वच मुलांना बक्षिस दिले गेले. ज्युनियर के. जी.च्या मुलांना रंगपेटी तर सिनियरच्या मुलांना पट्टी, पेन्सिल, खोडरबर अशी भेट दिली गेली.

**१९ डिसेंबर-वार्षिक स्नेहसंमेलन**



**सांस्कृतिक कार्यक्रमातील एक क्षण**



**मा. मा. य. गोखले यांच्या हस्ते पुष्प गुच्छ देताना व्यासपीठावर सर्व मान्यवरांसोबत सौ. सुमेधाताई बेडेकर**

आमच्या पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन १९ डिसेंबरला डॉ. बेडेकर शाळेच्या पटांगणात पार पडले. मुलांचे वय आणि नृत्याची शारीरिक क्षमता लक्षात घेऊन शिक्षकांनी गाण्यांची निवड केली होती. विविध भाषांतील विविध विषयांवरील गाणी शिक्षकांनी नृत्यासाठी निवडली. विभाग प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी स्वागत व प्रस्ताविक भाषण केले. वर्षभरातील विविध उपक्रमांची माहिती पालकांना करून दिली. यानंतर विविधतेने नटलेला नृत्याचा तसेच नाटुकल्यांचा कार्यक्रम आमच्या बालकलाकारांनी सादर केला. ज्या धिटाईने विश्वासाने हे कलाकार आपली कला सादर करत होते ते बघून जमलेले पालक थक्कच झाले. उपस्थितांनी मुलांचे भरभरुन कौतुक केले.

**आजी-आजोबा शाळेत...**

रोज नातवंडांना शाळेत सोडायला किंवा आणायला येणारे आजी-आजोबा आज त्यांचा दिवस म्हणून उत्साहात होते. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद गेली ७-८ वर्षे आम्ही अनुभवत आहोत. आजी आजोबांसाठी मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित केला जातो. यावर्षी २० डिसेंबर २०१३ रोजी बेडेकर शाळेच्या पटांगणात हा दिवस दोनही विभागाच्या (ज्युनियर व सिनियर के. जी.) आजी आजोबांसाठी आम्ही साजरा केला होता.

सिनीयर के. जी. च्या मुलांकडून त्यांच्या आजी आजोबांचे फोटो मागवले होते. ते फोटो सजावट करून सुबक तऱ्हेने मांडून ठेवले होते. सकाळी ९.३० च्या सुमारास आजी आजोबांच्या आगमनाला सुरुवात झाली. अत्तर लावले आणि नातवंडांनी केलेले फोटो देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. आजी-आजोबा आणि नातवंडे यांचे नाते प्रेमाचे लाडाचे असते. तसेच दिवसभर पालकाची उणीव भरुन काढायचे महत्त्वाचे काम आज हेच आजी आजोबा अतिशय आत्मीयतेने करतात. याचा उल्लेख सौ. मुळगुंद यांनी आपल्या मनोगतात केला.

---

कालच्या दिवसाचा अंत झाला आहे, उद्याचा दिवस अजून यायचा आहे; माझ्या हातात सुखाने जगण्यासाठी फक्त एक दिवस आहे. - ग्राउचो मार्क्स

ज्या ज्येष्ठ नागरिकांसाठी एका खास नाटिकेचे सादरीकरण आमच्याच शाळेच्या विद्यार्थ्यांनी केले. 'माऊली' या नाटिकेद्वारे पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांची भक्ती, विठ्ठल दर्शनाची आस, एकमेकांना मदत करण्याची वृत्ती दाखवली गेली. शहरातील एका मुलाला या सर्वांचे महत्त्व सांगणारी, आई-वडिलांशी नातं दृढ करणारी अशी नाटिका बघताना अनेकांच्या डोळ्यांत अश्रू आले.

यानंतर शाळेचे माजी विद्यार्थी असलेले डॉ. श्री. सुकुमार व त्यांच्या पत्नी डॉ. सौ. माधुरी साखरदांडे यांनी मराठी व हिंदी गाण्यांचा कार्यक्रम सादर केला. व्यवसायाने डॉक्टर असूनही आपली गाण्याची आवड त्यांनी जपली आहे. त्यांच्याबरोबर असलेले सहकलाकारसुद्धा अतिशय सुरेल व गोड गळ्याचे होते.

हार्मनी या वाद्यवृंदाने गणेश वंदनेने कार्यक्रमाला सुरुवात केली. जुन्या हिंदी आणि मराठी गाण्यांची ही सुरेल गीतमाला गुंफली गेली ही गाणी श्रोत्यांची आवड, वयोगट लक्षात घेऊन निवडली असल्याने आजी आजोबांनी कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद लुटला. या कार्यक्रमाचे निवेदन के. जी. विभागाच शिक्षिका सौ. संगीता रेळेकर यांनी केले.

या गाण्यांमध्ये प्रेक्षक रंगून गेले होते. त्यावर ताल धरुन, गुणगुणून कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद लुटत होते.

कार्यक्रम संपल्यावर सर्व आजी आजोबांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल अनेक आजी आजोबांनी शाळेचे आभार मानले. तसेच कार्यक्रम आवडल्याच्या अनेक प्रतिक्रिया देखील त्यांनी आर्वजून दिल्या.

## जोशी बेडेकर महाविद्यालय

२०१२-२०१३ या शैक्षणिक वर्षात कनिष्ठ महाविद्यालयाच्यावतीने विविध समित्यांनी विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवले. त्याचा वृत्तांत खालीलप्रमाणे आहे.

### भारतीय संस्कृती आणि वारसा समिती

१९ ऑगस्ट २०१३ रोजी 'आपल परम मित्र' चे उपसंपादक श्री. माधव जोशी यांनी दीपप्रज्ज्वलन करुन समितीचे उद्घाटन केले. 'वेदकाळातील सत्य, शिव आणि सुंदर अर्थात 'Way of Thinking' 'Way of Life', 'Way of Worship' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. आजच्या युगातील सर्वांचा श्वास असलेला भ्रमणध्वनी त्याचा नंबर १० डिजिटचा शोध भारतीय गणिततज्ज्ञ श्री. कापरेरकर यांनी लावला, ही माहिति त्यांनी दिली तसेच भारतीय शास्त्रज्ञांची श्रेष्ठता नमूद केली.

याच समितीतर्फे १९ सप्टेंबर रोजी शास्त्रीय तसेच लोकनृत्य याची माहिती, गाणी आणि नृत्याचा आविष्कार घडवून दिला. दि. २९ नोव्हेंबर दिवाळीचे औचित्य साधून 'सोबती' या अंध मुलांच्या शाळेत जाऊन वेगळा अनुभव घेतला. या कार्यक्रमात त्यांनी..

- शाळा आकाश दिव्यांनी व रांगोळ्यांनी सजविली.
- गाणे, अंताक्षरी गोष्टी विनोद सांगितले.
- मुलांना क्राफ्टची ग्रीटिंगकार्ड करण्यास शिकवले.

विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा मनसोक्त आनंद लुटला. 'दोन पिढ्यांमधील सुसंवाद' या समितीच्या अध्यक्षा प्रा. सौ. सुहासिनी दहिवले व 'भारतीय संस्कृती आणि वारसा समिती' अध्यक्षा यांच्या संयुक्त विद्यमाने 'सोबती' या संस्थेचा उपक्रम राबवला. समिती सदस्य प्रा. मनुजा मीना, प्रा. सौ. रुचिता मोरे प प्रा. कुसुम यादव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

### दोन पिढीमधील सुसंवाद

या समितीने अंध व मतिमंद विद्यार्थ्यांनी बनविलेल्या राख्यांची विक्री विद्यार्थी व प्राध्यापक वर्गास केली. सहकार्याच्या भावनेतून या उपक्रमास सर्वांनी चांगला प्रतिसाद दिला.

जगण्याचे उद्दिष्ट असे असावे की, ते साध्य करताना येणारे अपयशही देदीप्यमान ठरावे.

२६ ऑगस्ट २०१३ या दिवशी सौ. शरयू गांधी यांचे "how to live & live" या विषयावर आपले विचार मांडले. त्यांचे चिरंजीव प्रसाद नागेश गांधी यास गंभीर स्वरूपाचा आजार असूनही स्वतः गुणांनी तो यशवंत ठरला व अनेक पुरस्कार त्यास प्राप्त झाले. तो आज या जगात नसला तरी विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे कार्यक्रम त्याच्या मातोश्री करत असतात व विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधतात. हा अनोखा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. प्रसादने काढलेल्या चित्रांची शुभेच्छा पत्रे ही विद्यार्थ्यांनी उत्साहाने विकत घेतली. तो निधी सामाजिक कामासाठीच वापरला जातो. या समितीच्या अध्यक्षा प्रा. सौ. सुहासिनी दहिवले मॅडम व समिती सदस्यांनी चांगले सहकार्य केले.

**स्कॉलर ॲकडमी**

शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ साठी स्कॉलर्स ॲकॅडमीने ११ जुलै २०१३ रोजी प्रा. मनोज पाठारकर (इंग्रजी विभाग - वरिष्ठ महाविद्यालय) यांचे 'संगणक सादरीकरणाची कला' या विषयाचे व्याख्यान आयोजित केले होते. १३ ऑगस्ट २०१३ रोजी प्रा. अंजली पुरंदरे (ज्युनिअर कॉलेज इंग्रजी विभाग प्रमुख) यांचे 'संवाद कौशल्य' मार्गदर्शन पर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ५ ऑक्टोबर २०१३ रोजी प्रा. सरफजी ब्रिगॅन्झा (कनिष्ठ महाविद्यालय भूगोल विभाग प्रमुख) यांनी 'पृथ्वीवर बदलणारी वेळ' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या समितीच्या अध्यक्षा प्रा. सरफजी ब्रिग्रँझा व सदस्या भावना पवार यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

५ ऑक्टोबर २०१३ रोजी डॉ. उल्हास कोल्हटकर यांनी 'वेळेचे व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी व समिती सदस्यांचे चांगले सहकार्य लाभले. हे या सर्व कार्यक्रमांचे आयोजन स्कॉलर ॲकॅडमीच्या अध्यक्षा प्रा. भावना पवार यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या मनात संशोधनाची आवड निर्माण करणाऱ्या 'संशोधन समितीचे' उपक्रमही स्तुत्य होते.

१३ जुलै २०१३ रोजी विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची पहाणी करण्यासाठी नेले. ग्रंथालयाच्या सुविधा, ग्रंथाची विभागणी कशी असते. ग्रंथालयाचा वापर कसा करावा हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रंथालय भेटीतूनच शिकवता आले. उत्तराखंडात आलेला प्रलयाच्या निमित्ताने २६ सप्टेंबर २०१३ ला नैसर्गिक आपत्ती कशी असते, त्याची माहिती दाखवून त्या आपत्तीचे विश्लेषण करण्यात आले. चर्चा करण्यात आली.

कला व वाङ्मय मंडळाचे उद्घाटन केळकर-वझे महाविद्यालयाचे मराठी वरिष्ठ प्राध्यापक (कनिष्ठ महाविद्यालय) श्री. शिंदे सर यांच्या हस्ते झाले. प्रा. तृप्ती सोनावणे व प्रा. काळे सर या समितीच्या अध्यक्षांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. काव्य वाचन व गीत गायन स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते.

'स्पीकर ॲकडमी' च्या वतीने विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी व 'वक्ता दशसहस्त्रशु' या उक्तीनुसार विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्वाची कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेसाठी ५५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. जोशी बेडकर महाविद्यालयाच्या प्रा. प्रियंवदा टोकेकर (राज्यशास्त्र विभाग) (आदर्श शिक्षिका-मुंबई विद्यापीठ) यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्रत्यक्ष कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग हे ह्या कार्यक्रमाचे विशेष होते.

उत्तम वक्ता होण्यासाठी वाचन, लेखनाची आवड, सवय असणे व स्वतःचा कान तयार होण्याची गरज असते. विद्यार्थ्यांना विविध विषय देऊन त्यावर वाचन व लेखन करण्यास प्रवृत्त केले व विद्यार्थ्यांनी त्यास चांगला प्रतिसाद दिला.

स्वामी विवेकानंद १५० व्या जयंतीनिमित्त स्वामी विवेकानंदाच्या जीवनपटावर विविध विषय विद्यार्थ्यांना

व्याख्यानासाठी दिले. विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा उत्तम वापर करुन उत्कृष्टपणे भाषणे सादर केली. उत्स्फूर्त ललित विषयावरील वक्तृत्व स्पर्धेतही विद्यार्थ्यांचा सहभाग स्फृहणीय होता.

प्राचार्य डॉ. शकुंतला अ. सिंह यांच्या मार्गदर्शनानुसार वर्गावर्गातून वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्याची अंतिम फेरी फेब्रुवारी शेवटच्या आठवड्यात संपन्न होईल.

विद्यार्थ्यांच्या वाक्‌चातुर्यांच्या कौशल्यासाठी समितीच्या अध्यक्षा डॉ. माथूर वैश्य, डॉ. राधिका पारसनीस-गुप्ते यांनी १५ दिवसातून दोन दिवस याप्रमाणे वाक्‌चातुर्यांसाठी सहा सत्रे विद्यार्थ्यांची घेतली. वक्तृत्व बोलणे...या जीवनातील उपयोग या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**Nature Club** च्यावतीने प्रा. छाया कोरे यांनी नावीन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी केले. त्याचा क्रमशः तपशील पुढील महिन्याच्या वृत्तात वाचूया.

कनिष्ठ महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापक विद्यार्थ्यांच्यासाठी निःस्पृह कार्यक्रम करत असतात. या कार्यक्रमास विद्यार्थ्याचा सहभाग मिळतोच. पण त्याचबरोबर प्राचार्य डॉ. सिंग, प्राध्यापक वर्ग, कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य सौ. गौरी तिरमारे यांचाही पाठिंबा मोलाचा असतो. पर्यवेक्षक श्री. शर्मा सर, सौ. दिक्षित मॅडमही कार्यक्रमास उपस्थित रहातात व मार्गदशन करतात.

कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गासाठी आठवड्यातून एकदा व्याससभेचे आयोजन केले जाते. विविध विषय घेऊन स्वतःच्या कल्पना, विचारांचे आदानप्रदान व्यास सभेत होते. समितीच्या अध्यक्षा सौ. गौरी झोपे यांनी 'माझी आवडती कविता जीवनातील हसण्याचे महत्त्व' अशा विविध विषयावर चर्चा आयोजित केली होती. प्राध्यापक वर्गाने त्यास चांगला प्रतिसाद दिला.

## सार्थ पसायदान

आता यावर विश्व स्वरूप, सद्‌गुरु यांनी माझ्या वागयज्ञेकरून संतुष्ट होऊन मजला हा प्रसाद द्यावा, कीं, दुष्टांचा कुटिलपणा जाऊन त्यांना सत्कर्माची प्रीती उत्पन्न होवो; व जीवमात्रांची एकमेकांशी मैत्री वाढो. या सर्व विश्वामधील पापरूपी अंधकार नाहीसा होऊन स्वधर्मरूपी सूर्य उगवून त्याचा प्रकाश होवो आणि प्राणिमात्राच्या ज्या ज्या इच्छा असतील त्या त्या पूर्ण होवोत.

या भूतलावर अखिल मंगलांचा वर्षाव करणाऱ्या भगवत् भक्तांच्या समुदायांची सर्व भूतांना सद्‌भावेकरून सदोदित भेट होवो. ते भक्तजन कसे आहेत, तर चालते बोलते कल्पतरूचे बाग, जिवंत चिंतामणीचे गाव, किंवा अमृताचे चालते बोलते समुद्रच होत. जे कलंकरहित प्रतिचंद्र, संसाररूपी अधंकार दूर करून शांतिसुख देणारे प्रतिसूर्य असे भगवत् भक्त, ते सकल जीवांना प्रिय होवोत.

फार काय मागावे! सर्व त्रैलोक्यसुखाने परिपूर्ण होऊन प्राणिमात्राला हरीचें अखंड भजन करण्याची इच्छा होवो आणि या ग्रंथावरच ज्यांचे उपजीवन आहे, त्यांना इहलोकचे व परलोकचे सुख प्राप्त होवो !

तेव्हा सदगुरू प्रसन्न होऊन म्हणाले की, तुझ्या म्हणण्याप्रमाणे सर्व होईल. असे वरप्रदान मिळाल्याने श्रीज्ञानदेव फार संतोषित झाले.

(अध्याय अठरावा : ओवी क्र. १७९३ ते १८०१)

●●●

# विद्या प्रसारक मंडळ

विष्णुनगर, नौपाडा, ठाणे ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५४२६२७०

भारतातील महान गणितज्ज्ञ व खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य यांच्या सन्मानार्थ ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळ या संस्थेने त्यांचे ९०० वे जन्म वर्ष साजरे करायचे ठरविले आहे. त्या निमित्ताने तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे.

अनेक पिढ्या ज्योतिषशास्त्राची परंपरा असणाऱ्या विद्वान कुटुंबात भास्कराचार्यांचा इ.स. १११४ साली जन्म झाला. सर्व ज्ञानशाखांत नैपुण्य मिळवत त्यांनी गणित व खगोलशास्त्राच्या साहित्यात मोलाची, महत्त्वाची भर टाकली. विषयाची परिपूर्ण हाताळणी, साहित्याचे विचारपूर्ण संगठन केले आणि विषय स्पष्टपणे मांडले, ज्याचा येणाऱ्या शतकांतील विषयांच्या विकासावर प्रभाव पाहावयास मिळतो. भास्कराचार्यांच्या साहित्याचा सर्व देशांत अभ्यास केला जातो व त्यावर अनेक प्रकारचे टीकात्मक व अभ्यासपूर्ण साहित्य निर्माण केले जाते.

# भास्कर ९००

भास्कर ९००

## आंतरराष्ट्रिय परिषद

## भास्कराचार्यांच्या ९०० व्या जन्म वर्षनिमित्ताने

विबुधाभिवन्दितपदो जयति श्रीभास्कराचार्यः

**शुक्रवार दि. १९; शनिवार दि. २० आणि रविवार दि. २१ सप्टेंबर २०१४**

स्थळ :
थोरले बाजीराव पेशवे सभागृह,
ज्ञानद्वीप, ठाणे महाविद्यालय परिसर,
चेंदणी, बंदर रोड, ठाणे, महाराष्ट्र, भारत - ४०० ६०१

**http://www.vpmthane.org/bhaskara900/**

इतरांचे दोष काढण्याऐवजी जे स्वतःमधल्याच दोषांचा शोध घेतात. तेच सुखी होतात.
- मोहंमद (इसेन्शियल सुफीझम)

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

---

मला दफन करताना माझे हात उघडे ठेवा...म्हणजे जगाला कळेल की ज्याने जग जिंकले, तो ते सोडून जाताना रिकाम्या हातानेच गेला. - अलेक्झांडरचे अखेरचे शब्द

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे.** त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,
**डॉ. विजय बेडेकर**
कार्याध्यक्ष
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●



*आमचे श्रद्धास्थान*

# डॉ. वा. ना. बेडेकर

(२० फेब्रुवारी १९१७ - १४ एप्रिल २००४)

## *जयंतीनिमित्ताने अभिवादन*

**डॉ. वा. ना. बेडेकर यांचे व्यक्तिमत्व अत्यंत साधे, निर्मळ, प्रचंड कामसू, ध्येयवादी घडणीचे त्यांचा प्रचंड काम करण्याचा स्वभाव श्रेष्ठ देशभक्ती, उच्चतम सेवाभाव, निर्व्याज हास्य, त्यांच्या स्वच्छ निर्मळ भावनांचा तळ यांच्या चमकदार डोळयात दिसे. तहान - भूक हरवून कामात रमण्याचा स्वभाव आणि न कंटाळता, न थकता अखंडपणे सुरू असलेली त्यांची शिक्षण साधना हे सारेच अचंबित करणारे होते. त्यांच्या विचारात कृतीत रंगलेल्यांना - गांजलेल्यांना जीवनात उभे करण्याची तळमळ असे. त्यांच्या बोलण्याला विचाराला श्रद्धेचा, निष्ठेचा, आत्मविश्वासाचा आधार होता. कृतिशीलता त्यांचा बाणा होता. कर्मकांडाला गौण स्थान देउन आधुनिक वैज्ञानिक दृष्टी आणि प्रखर बुध्दीमत्ता जपणाऱ्या डॉक्टरांबद्दल सर्वांनाच आत्मीयता आणि आदर वाटे. कोवळ्या नारळाच्या रोपांच्या लागवडीतून त्यांचा अल्प ध्येयवाद फोफावला. या कल्पवृक्षाने त्यांच्या हृदयातल्या आशा - आकांक्षा फुलवल्या. डॉक्टरसाहेब उत्तम द्रष्टे आणि नियोजक होते. त्यांच्या गुणांचा आदर्श ठेवूनच आमची वाटचाल सुरू आहे. त्यांचा उत्साह संसर्गजन्य ठरला. गुरूतुल्य, ज्ञानऋषींना, शिक्षणतज्ज्ञांना विनम्र अभिवादन !**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

❉ अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा
❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा
अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❉ संपर्क ❉

कार्यवाह
**विद्या प्रसारक मंडळ**
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.